भाग : १



साधनपदावली

संकलन, संपादन, पदभूमिका

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

साधनपदावली

भाग : १

(भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग व पदे)

❐

संकलन, संपादन, गायन

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी.

* साधनपदावली : भाग १

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑक्टोबर २०१२
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : **www.pethekaka.com**
युट्यूब चॅनेल : **Shri Pethe Kaka**
अँड्रॉईड ॲप : **SadhanNandadeep** (साधननंदादीप)

सकल संतचरणी कृतज्ञतापूर्वक समर्पण ...

- सुहास पेठे

पार्श्वभूमी

श्रींच्या कृपेने साकारलेल्या 'पदावली' ची ही स्वतंत्र आवृत्ती साधकांच्या सेवेत सादर करताना आनंद होतो. 'साधनपदावली'च्या सातव्या आवृत्तीनंतर मध्यंतरी 'साधनसांगाती' या नावाने संतछायेतील समग्र उपासना विस्तृत स्वरूपात उपलब्ध झाली होती. ती आता येथील नित्योपासनेपुरती राहणार असल्याने व त्याची सुधारित आवृत्ती, त्यात सातत्याने पडत असलेली भर लक्षात घेता, सतत प्रसिद्ध करणे अवघड आहे. त्यामुळे ती भर शक्यतो येथील आवृत्तीत हाती घालण्यात येत आहे. मात्र परगावच्या तसेच येथीलही साधकांच्या घरच्या उपासनेसाठी 'साधनपदावली' व 'कृपापदावली' यांची वाढती गरज लक्षात घेऊन आता 'साधनपदावली'ची आठवी आवृत्ती पहिला भाग म्हणून प्रसिद्ध होत आहे. तसेच 'कृपापदावली'चाही आता खूप विस्तार झाल्यामुळे 'कृपापदावली'चा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. या दोनही पदावलींचे पुढील भाग अनुकूलतेनुसार प्रसिद्ध होत आहेत.

पदांच्या निवडीमागील विचार पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला असून कोणता विशिष्ट संप्रदाय, कर्ता, मत अशा गोष्टींना प्राधान्य दिले जात नसून भाव, भक्ती, विचार, करुणा, तळमळ, मार्ग, सावधानता इत्यादी गोष्टी प्रधान धरल्या आहेत. त्यामुळे सर्व पंथातील किंवा वेळी कुठल्या

पंथाशी बांधील नसलेल्या पण जिज्ञासू व्यक्तींनाही या दोन्ही पदावलींचा व त्यांतील प्रार्थना, अभंग, पदे, आरत्या, श्लोक, नवनव्या उपासनामाला, नवे नित्यपाठ – यांचा यापुढेही पूर्वीप्रमाणेच उपयोग होईल, अशी आशा आहे.

त्यामुळे साधनेचा मार्ग, विचार स्पष्ट होईल, प्रपंचात व परमार्थातही अत्यंत गरजेची असलेली सावधानता बाळगता येईल, खाचखळगे कळून येतील, टाळता येतील, दिशाभूल वाचेल, अवडंबर – कर्मठपणा कमी होईल, आपापला पंथ– साधन–गुरू–नाम यांच्याविषयी भाव वाढेल पण त्यातली आग्रही भूमिका कमी होईल, इतर साधने – संप्रदाय यांविषयी आदरभाव निर्माण होईल, तसेच स्वतःच्या गुरूंविषयी, उपास्याविषयी भाव स्वच्छ, निश्चित व शुद्ध होईल, अशी पदे घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो साधकांना उपयोगी ठरावा, ही इच्छा.

यापूर्वीच्या आवृत्त्यांमध्ये तसेच साधनसांगातीमध्येही फक्त मूळ पदे, पदकर्ते व अनुक्रमणिका एवढ्याचाच समावेश केला होता.परंतु त्यानंतर त्या पदांच्या येथे म्हणण्यात असलेल्या चाली जिज्ञासूंपर्यंत पोचाव्या यासाठी, प्रथम साधनपदावलीच्या अकरा कॅसेट्स् व कृपापदावलीच्या पाच कॅसेट्स् आणि नंतर सीडीज्, पुढे डीव्हीडीज्

काळानुसार प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावेळी या पदांना पदभूमिकाही देण्यात आल्या होत्या. त्या भूमिका संक्षिप्त असल्या तरी, पदांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा साधकांना अतिशय उपयोग होत असतो, म्हणून पदावलीची पुढील आवृत्ती प्रसिद्ध करताना या भूमिकांचा समावेश या पदांबरोबर करण्यात यावा अशी अनेकांची सूचना होती. ते या आवृत्तीपासून शक्य होत आहे, याचाही आनंद होतो. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार कठीण शब्दांचा अर्थही त्या त्या ठिकाणी देण्याचा प्रयत्न केला आहे.

पदावलीच्या या निरंतर प्रकल्पाला अनेकांचा हातभार लागत आला आहे. मूळ सोळा कॅसेट्स्चे रेकॉर्डिंग अत्यंत आपुलकीने व सेवाभावाने करणाऱ्या सौ. राधिका हंगेकर, श्री. हंगेकरसाहेब व त्यांचे चिरंजीव यांना तसेच, घरी पुढील रेकॉर्डिंग, एडिटिंग तसेच या भागांचे प्रकाशन, वितरण यांना हातभार लावणाऱ्या सर्व लहानथोर साधकमंडळींना धन्यवाद द्यावे, तेवढे थोडेच आहेत.

साधनपदावलीतील पदांचे कर्ते – संतमंडळी, त्या पदांचे प्रकाशक व तीन कन्नड अभंगांचा अर्थ ज्या संकलनातून उद्धृत केला आहे, त्या श्री चैतन्यगाथेचे प्रकाशक आदि सर्वांचे ऋण न फिटणारे आहे. सर्व

साधकांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार.

ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यापूर्वी नुकतीच २१२ ट्रॅक्सची ऑडिओ डीव्हीडी क्र.७ प्रकाशित झाली आहे. ती ती पदे त्यातून ऐकण्यास सुलभ जावी म्हणून, पदाच्या शेवटी त्या त्या पदाचा ट्रॅक नंबर दिला आहे. अधिक सोयीसाठी श्रींच्या कृपेने साधनपदावलीची व कृपापदावलीची ऑडिओ सीडी पदावलीच्या भागानुसार लवकरच उपलब्ध होत आहे.

येथील पदांची मांडणी डीव्हीडी क्र.७ मधील क्रमाने केली असून विशिष्ट पद चटकन मिळावे म्हणून अनुक्रमणिका मात्र अकारविल्हे देण्यात आली आहे.

या पदांच्या निरंतर अभ्यासाने, अर्थाच्या मनन चिंतनाने, ती पदे अर्थ लक्षात घेऊन मनापासून म्हणण्याने – आपले अंतरंग शांत होवो, उजळून निघो, ते परमार्थाला उत्तरोत्तर अधिक अनुकूल होवो – अशी श्री गोंदवलेकर महाराजांना व सर्व संतसत्पुरुषांना प्रार्थना करून, या पदावलींची सेवा त्यांच्या चरणी अर्पण करीत आहे.

संतछाया, सातारा. **– सुहास पेठे**

साधनपदावली भाग : १

वर्णानुक्रमणिका

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१.	अपुले तनुमन नाही हाती	..४१..
२.	अवघा तो शकून	..५९..
३.	अहो प्रभु काल बडो बलकारी	..३७..
४.	अज्ञानाचा नाश केला तू दुरिताचा	..७९..
५.	आता काही नाही हरीविण मज	..५७..
६.	आम्ही पायी येऊ जाऊ	..३९..
७.	आहे त्याचा भोग, नाही त्याचा त्याग	..३५..
८.	ऐसी संतांची ही ग्वाही	..१२५..
९.	ऐसे काही करी काम	..१२३..
१०.	कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा	..६७..
११.	करुनी विनवणी पायी ठेवितो माथा	..८५..
१२.	कशी खंत वाटेना	..४९..
१३.	काही उपाय चालेना	..६५..
१४.	केव्हा कृपा करिल गुरुमाय	..१०९..
१५.	गाई गाई मना रे हरिचे गुण गाई	..१०३..
१६.	गेला गेला जन्म वाया	..४७..
१७.	चित्त असो द्यावे निवांत प्रसन्न	..१३..
१८.	चौऱ्यांशी आसने केली	..१५..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१९.	ज्याचे शुद्ध अंत:करण	..१०७..
२०.	तुझे रूप ध्यानी राहो माझे मनी	..३३..
२१.	तुझे रूप सदोदित । भरो माझे हृदयात	..७७..
२२.	तू आम्हा सोयरा सज्जन सांगाती	..७५..
२३.	दुर्बुद्धी ते मना । कदा नुपजो नारायणा	..४५..
२४.	दुर्लभ नरदेह जाला तुम्हा आम्हा	..१०१..
२५.	धन्य इवर ताई धन्य इवर तंदे	..८१..
२६.	नरदेहा येऊनी स्वहित करावे	..२३..
२७.	नश्वर सब संसार	..७१..
२८.	नाम नाम नाम जपो	..८९..
२९.	नामचि कारण रे	..५३..
३०.	नाव मारुतीचे घ्यावे	..११७..
३१.	नाही भाव नाही सेवा	..२१..
३२.	नित्य उठोनिया खायाचीच चिंता	..९१..
३३.	निश्चय पूर्ण करा	..७३..
३४.	प्रभु माझा काय करिल ते खरे	..९३..
३५.	प्राणि जन्मासी हो आला	..११९..
३६.	बहु अपराधी जन्मलो पाषाण	..४३..
३७.	भजन बिन बावरे	..६१..
३८.	मन की बात न मानो साधो	..११३..
३९.	माझे चित्त तुझे पायी राही ऐसे करी काही	..५१..
४०.	माझे चित्त सदा करा पायी स्थिर	..११५..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
४१.	मान ले कहना हमारा	..८७..
४२.	मी माझे विसरुनी जाई	..६९..
४३.	मैं तो तेरे भजन भरोसे अबिनासी	..१११..
४४.	मोरया तूच मला तारी	..१९..
४५.	रे राघोबा लागलो तुझिया पंथा	..५५..
४६.	वीतभर पोट लागलेसे पाठी	..१२१..
४७.	श्री गुरु माझा दत्त दयाघन रे	..३१..
४८.	संत आले महीवर	..२५..
४९.	संतसंगतीचा लाभ घेई मना	..२७..
५०.	सतसंगत जग सार	..९९..
५१.	सर्व शब्दांचा घोटाळा	..२९..
५२.	सर्व सुख माझे	..९७..
५३.	सर्व साधनांचे सार । सखा माझा रघुवीर	..९५..
५४.	हरि के भजन बिना सुख नाही	..१०५..
५५.	हरि नाम मुखी, हरि नाम मुखी	..६३..
५६.	हरि मज कसा करिल भवपार	..१७..
५७.	हेचि माझे तप	..८३..

*

भूमिका

भगवंताशी संवाद साधायला जी अनेक साधनं आहेत त्यांत भजन हे अत्यंत पुरातन, सुगम, प्रभावी आणि अनुभवसिद्ध साधन आहे. अभंगाला किंवा पदाला जुजबी तालासुराची जोड दिली तर त्यातल्या भावाचा परिपोष होतो आणि स्वतःचा विसर पडून भगवंताचं अनुसंधान वाढायला मदत होते. पण यासाठी भजनाकडं भगवंतप्राप्तीचं साधन म्हणून पाहण्याची गरज आहे. साधन म्हणून त्यात तालासुरापेक्षा त्यातल्या शब्दांना, अर्थाला, भावाला आणि त्याहीपेक्षा त्यात व्यक्त झालेल्या पदकर्त्याच्या हृदयाला जास्त महत्त्व आहे. या अर्थानं भजन घडायचं तर त्यासाठी पदं निवडताना ती साधकवृत्तीची असावीत. करुणापर, श्रद्धापर, तळमळीची अशी असावीत. त्याची चाल, ठेका हीसुद्धा साधी राखावी. सर्वांना म्हणता येतील अशी ठेवावी. अशा काही खुणा श्री गोंदवलेकर महाराज आणि पू. बाबा बेलसरे यांनी सांगितलेल्या आहेत. या दृष्टीनं भजन लिहिताना जसं कविता नव्हे तसं म्हणतानाही ते गाणं नव्हे अशा साऱ्या भूमिकेला धरून गेली अनेक वर्षं अनेक टप्प्यांमध्ये आणि भागांमध्ये या पदावलीची रचना करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यातली पदं म्हणताना त्यातल्या भावाशी तादात्म्य व्हावं आणि आपल्या साधनेला ती उपयुक्त ठरावी अशा दृष्टीनं ती ऐकावी, म्हणावी, अशी कळकळीची विनंती आहे.

चित्ताची सदैव असणारी शांत आणि प्रसन्न अवस्था हे संतत्वाचं सामान्यांना आकलन होऊ शकणारं एक लक्षणच म्हणावं लागेल. ही शांत आणि प्रसन्न अवस्था आपणही अनुभवावी असं सामान्य माणसाला वाटतं, हे ही खरं. ती अवस्था कशी येऊ शकेल याचं अत्यंत मोजक्या शब्दांत दर्शन स्वामी स्वरूपानंदांच्या या स्वानुभवाच्या पदात आहे. कुठल्याही प्रसंगाचा किंवा आपत्तींचा खरा अर्थ आपल्याला लागत नाही, त्यामागची ईश्वरी योजना लक्षात येत नाही, हे जाणून संकटांचा, आपत्तींचा त्रास मानू नये, प्रपंचामध्ये सदैव अलिप्त राहण्याचा प्रयत्न करावा, मायापाश जोडू नये, काही करून ईश्वरावरचा, त्याच्या कृपेवरचा विश्वास ढळू देऊ नये आणि याला सोपं साधन – संतांच्या सहवासाचं. तो संतसहवास काही केल्या सोडू नये. एवढं करीत गेलं तर सामान्यांनाही शांत आणि प्रसन्न चित्ताचा प्रत्यक्ष अनुभव स्वामींच्या कृपेनं येईल, यात शंका नाही.

..१..

चित्त असो द्यावे निवांत प्रसन्न ।
कल्पांतीही खिन्न होऊ नये ।।१।।

अंतरी असावा अखंड उल्हास ।
आपत्तीचा त्रास मानू नये ।।२।।

संसारी रहावे अलिप्त उदास ।
मोहे मायापाश जोडू नये ।।३।।

स्वामी म्हणे व्हावा ईश्वरी विश्वास ।
संतांचा सहवास सोडू नये ।।४।।

– स्वामी स्वरूपानंद

(ट्रॅक नं. ००२)

कठीणपणा आणि साधना यांचं कुठंतरी एक सूक्ष्म नातं माणसाच्या, निदान साधकाच्या मनानं तरी, गृहीत धरलेलं आहे. त्यापोटी भगवंताच्या प्राप्तीसाठी करायची ही साधना अनेक प्रकारे शरीर कष्टांची आणि देहदंडाची होऊन बसली आहे. तर दुसऱ्या बाजूला अनेकांना भगवंतापेक्षा, सूक्ष्म स्वरूपाच्या सत्तेचं आणि सिद्धींचंच नकळत आकर्षण वाटतं आहे. श्री गोंदवलेकर महाराज यांनी या अभंगामध्ये या साऱ्या धोक्यांपासून सावध करताना म्हटलं आहे की, बाबांनो भगवंत हा अत्यंत सहज, अकृत्रिम आणि अतिशय साध्या नैसर्गिक प्रयत्नांनी मिळणं शक्य असताना, इतक्या वेगवेगळ्या आणि दिशाभूल करणाऱ्या वेड्यावाकड्या वाटांना का जाता ?

सामान्य माणसाच्या दृष्टीनं अवघड असलेल्या योग, कुंडलिनी जागी करणं, शब्दज्ञानाच्या आहारी जाणं–असल्या कठीण गोष्टी करण्यानं कदाचित सिद्धीसारख्या काही गोष्टी साध्यही होतीलही, पण भगवंत दूर राहील. म्हणून सावध होऊन साधं, सोपं नाम गाऊन सहजपणानं भगवंतच मिळवावा. तसं केलं तर बाकी सहजच हाती येतं आणि तेसुद्धा गरज असल्यास हाती येतं आणि त्यातही पुन्हा त्यातले सगळे धोके टळून हाती येतं. हे श्री महाराजांचं म्हणणं, सर्वांनाच लक्षात ठेवण्यासारखं आहे.

..२..

चौऱ्यांशी आसने केली ।
काय तुला प्राप्ती झाली ।।धृ।।
अष्टांग योग केला ।
परी काळ घेऊनि गेला ।।१।।
कुंडलिनी उत्थापियली ।
सहज प्राप्ती दुरावली ।।२।।
नित्य वेद पाठ केले ।
अर्थ वेगळे राहिले ।।३।।
शब्दज्ञान पैसावला ।
भक्तिज्ञानासी मुकला ।।४।।
सिद्धिमागे लागला ।
त्यासी दिवसा घाला आला ।।५।।
चक्रमुद्रा केली भेदी ।
त्यासी भ्रांति लागली आधी ।।६।।
दास म्हणे राम गाता ।
सर्व सहज आले हाता ।।७।।

– श्री गोंदवलेकर महाराज

पैसावला – वाढला/मोठा झाला,
चक्रमुद्रा...भेदी – योगमुद्रांच्या साहाय्याने षट्चक्रांचा भेद करण्याची विद्या शिकला.

(ट्रॅक नं. ००३)

ही अत्यंत भावमय रचना, सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या, श्री विष्णुदास महाराजांची आहे. हे मूळचे सातारचे सत्पुरुष. लवकर वयात उपरती होऊन, दत्तभेटीच्या तळमळीनं अनेक तीर्थक्षेत्रं धांडोळून, पुढं ते माहूर क्षेत्री अनुभव मिळवून स्थिर झाले. त्या काळानुसार लहान वयात पत्करलेलं विवाहाचं बंधन निभावून त्यांनी पुढं अनेक वर्ष लौकिक प्रपंचही केला. पण त्यांची भगवंताविषयीची तीव्र ओढ आणि विरक्त अवस्था मात्र आजन्म कायम राहिली. तिचं दर्शन या अभंगात प्रभावीपणे होत आहे.

संसाराच्या भवजाळामध्ये गुरफटून मी आजन्म दारोदार फिरलो, हे सांगून ते म्हणतात, माझ्या दुष्कृत्यांच्या राशी पाहिल्या तर माझ्यासारखा अपराधी मीच, असं मला वाटतं. मला या जगात आता भगवंताचाच आधार उरला आहे असं वाटतं. तो भगवंत कृपावंत होऊन धावून येऊन मला या भवसागरातून कसा बरं उद्धरील, असं मला झालं आहे. हे वारंवार सांगून अखेरीस ते भगवंताच्या भक्तांनाच विनवणी करतात की, आपणच माझी ही स्थिती ध्यानी घ्या आणि माझा उद्धार भगवंत लवकरात लवकर कसा करील, ते कृपा करून पहा. विष्णुदासांची ही भक्तीतली अवस्था आपल्या मनाला प्राप्त व्हावी, म्हणूनही आपण हा अभंग म्हणणं, उपयुक्त ठरेल.

..३..

हरि मज कसा करिल भवपार ।।धृ।।
भवसंसारी भ्रमलो ,
श्रमलो , फिरलो दारोदार ।।१।।
मी दुष्कृतनिधि , मी दुर्बुद्धी ,
मी अपराधि अपार ।।२।।
निराधार मी , जगति कुणाचा ,
नाही मज आधार ।।३।।
धीर धरवेना , मज तरवेना ,
भवसागर अनिवार ।।४।।
विष्णुदास म्हणे हरिभक्तांप्रति ,
विनवितो वारंवार ।।५।।

– श्री विष्णुदास महाराज

(ट्रॅक नं. ००४)

देवांना उद्देशून कितीतरी प्रार्थना केल्या जातात, विनवण्या केल्या जातात. पण त्यात अनेकदा काही लौकिक, प्रापंचिक गोष्टी मागितलेल्या असतात किंवा प्रपंचातल्या–देहातल्या उणिवा, दु:ख दूर करण्याची विनंती केलेली असते. पण खरे सत्पुरुष जेव्हा मागतात, तेव्हा ते काय मागतात हे, संत श्री कृष्णदास महाराज यांच्या पदामध्ये पाहायला मिळतं. ते श्री गजाननाला प्रार्थना करतात की, माझी ही भवव्याधी दूर करा. या देहबुद्धीनं, अभिमानानं मला दु:खात लोटलं आहे. त्यांचा नाश करा.

सामान्य माणसाचं मागणं आणि साधकाचं मागणं यांत जो फरक असायला हवा, त्याचं जणू मार्गदर्शनच आपल्याला घडतं आहे. त्यातही एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखं आहे. विघ्नहर्त्या, मांगल्याच्या दैवताला–मोरयाला प्रार्थना करतानासुद्धा, ते स्वत: रामाचे उपासक असल्यानं, मला – माझ्या बुद्धीला रामरायाच्या पायाशी ठेवा, अशी प्रार्थना ते करतात.

त्यांची ही विनंती साधकांना उपास्य दैवताच्या बाबतीतला एकनिष्ठतेचा वस्तुपाठ देऊन जाते. अखेरीससुद्धा ते इतर काही न मागता, तुझ्या हातांनी माझा पुनर्जन्म नाहीसा कर, हे मागतात. कोणतं मागणं खरं मागण्याजोगं आहे, हे या पदात शिकण्यासारखं आहे.

..४..

मोरया , तूच मला तारी ।
भवव्याधी जडली भारी ।।धृ।।

बहु जन्मांतर भोगित आलो ।
दु:खावर्ती व्यर्थ बुडालो ।
तयाचा संग मला मारी ।।१।।

सद्‌बुद्धी ही द्यावी दीनाला ।
श्रीरामी (हो) ठेवा मतीला ।
अभिमान मजला थोरी ।।२।।

कृष्णदास हात जोडुनी ।
करितसे हो तुम्हा विनवणी ।
करी पुनर्जन्म वारी ।।३।।

– ३श्री कृष्णदास

<u>महाराज</u>

करी – कराने/ हाताने, वारी – नष्ट करा, थोरी – मोठेपणा

(ट्रॅक नं. ००५)

श्री गोंदवलेकर महाराज यांचं हे पद म्हणजे आर्त भावानं रामाला केलेली अप्रतिम प्रार्थना आहे. भगवंताच्या प्राप्तीसाठी माणूस अनेक प्रकारची साधनं करतो. त्याची अशी प्रामाणिक समजूत असते की, या साधनानं आपण भगवंत गाठू शकू. ते खरंही आहे.

पण त्याला दोन बाजू असतात. एक ही की, साधनं ज्या उद्देशानं आणि शुद्धतेनं, ज्या पद्धतीनं व्हायला हवीत, तशी ती होत नाहीत आणि दुसरं म्हणजे, मुळातच अमुक एक साधन करून भगवंत गाठतो हीसुद्धा एक समजूतच असते. फक्त त्या समजुतीत अर्थ नाही हे कळण्यासाठी मात्र साधन करायला लागतं.

मग त्याचा परिणाम म्हणून, शेवटी, माणूस शरणागत होतो आणि भगवंतालाच म्हणतो की, काहीही करा, पण माझ्यावर कृपा करा आणि मला आपलासा करून घ्या. या साऱ्या अवस्था या अभंगात तन्मय होऊन अनुभवण्यासारख्या आहेत.

..५..

नाही भाव नाही सेवा ।
शरण आलो तुज देवा ।।१।।

नाही योग नाही तप ।
जन्म घेऊनि झाले पाप ।।२।।

नाही संध्या नाही स्नान ।
नाही घडले तीर्थाटन ।।३।।

नाही केले अध्ययन ।
नाही केले अन्नदान ।।४।।

नाही घडली गुरुसेवा ।
ऐसा पतित मी देवा ।।५।।

करुणा भाकी दास दीन ।
रामरूपी करा मन ।।६।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ००६)

माणसाच्या जन्माला येऊन माणसानं निदान स्वत:चं तरी खरं हित साधावं. आपलं खरं हित हे, अखंड आनंद स्वत: मिळवण्यात आहे, असं या पदामध्ये श्री संत कृष्णदास महाराज सांगत आहेत.

आपलं खरं हित साधायला, त्यांच्या दृष्टीनं गुरूंच्या उपदेशाचं सततचं श्रवण, मनन घडणं हे अत्यंत आवश्यक आहे. उगीच तीर्थाटन करून, धोंडे आणि पाणी बघून येण्यानं काय हित होणार ? खरा भगवंत हा सद्‌गुरूंच्या ठायी राहातो. म्हणून सद्‌गुरूंनी उपदेश केलेल्या मार्गानं जर गेलं, तर आपोआपच आपला मीपणा जाऊन सुखदु:खाकडे समदृष्टीनं पाहाता येतं. त्यामुळं मन देहाला विसरतं आणि आपल्याला अखंड आनंदाचा अनुभव येतो.

..६..

नरदेहा येऊनि स्वहित करावे ।
स्वानंदी भरावे मानवा रे ।।धृ।।
मानवा श्रवणी पाडी श्रीगुरुवाणी ।
तेणे सोडवणी होय तुझी ।।१।।
होय तुझी तुला सहजची प्राप्ती ।
मग भवभीती मुळी नाही ।।२।।
मुळी नाही देव सद्‌गुरुवाचोनी ।
पाहोनी धोंडा पाणी हित काय ।।३।।
हित काय करी स्वप्नीचे वैभव ।
सुख दुःख भाव सारिखेचि ।।४।।
सारिखेचि भाव जागृति झालीया ।
म्हणुनि गुरुराया शरण जावे ।।५।।
शरण जावे भावे मीपण त्यागावे ।
प्रारब्ध भोगावे सहजचि ।।६।।
सहजचि नाम मनी ध्याता गाता ।
निज ध्यास होता मन राम ।।७।।
मन राम झाले देहा विसंबले ।
कृष्णदासा आले निजभाग्य ।।८।।

– श्री कृष्णदास महाराज

विसंबले – विसरले

(ट्रॅक नं. ००७)

सामान्य माणूस जन्माला येतो आणि संतही जन्माला येतात. ते सामान्य माणसासारखेच दिसत असल्याने तेही आपल्यासारखेच आहेत, असंच अनेकांना वाटतं आणि त्यामुळं त्यांच्याशीही ते तसंच वागू जातात. तर दुसऱ्या टोकाला काही माणसांना संतांना आपलं ओझं होईल, त्रास होईल असं वाटतं. ते आदरानं, संकोचानं का होईना, दूर राहतात आणि संतसहवासाला मुकतात. वास्तविक बाह्यत: असे सत्पुरुष सामान्य माणसासारखे दिसत असले तरी, त्यांच्या येण्यात, राहण्यात आणि जाण्यात सर्वत्र फरकच असतो असं आढळेल. सामान्य माणूस जन्माला येतो, संत जन्म घेतात. माणूस जगात राहतो, संत जगासाठी राहतात. माणसाला मरण येतं, संत देह ठेवतात. असे संत, स्वत: स्वानंदाचा अनुभव घेत, अगदी सामान्यांतल्या सामान्य माणसालासुद्धा तो मिळवून देतात.

श्री गोंदवलेकर महाराज यांनी अशा संतांविषयीच्या दोन महत्त्वाच्या गोष्टी या पदामध्ये नेमक्या सांगितल्या आहेत. पहिली आणि आपल्याला दिलासा देणारी गोष्ट अशी की, जगाच्या उद्धारासाठी जन्माला आलेल्या संतांना आपण कितीही पतित, दुर्गुणी असलो तरी, आपलं कधी ओझं होत नाही आणि दुसरी सावध राहण्यासारखी गोष्ट अशी की, आपल्या आयुष्यात आनंदाची पूर्णिमा पसरविणाऱ्या या संतांचं मोठेपण ओळखणं, त्याप्रमाणं त्यांच्याशी वागणं आणि त्यांच्यासाठी आपलं सारं काही द्यायची तयारी दाखवणं, ही आपली कर्तव्यंच आहेत. अभंगाच्या अखेरीस तर श्रीमहाराज म्हणतात, स्वत:चा जीवसुद्धा या संतांवर ओवाळून टाकून त्यांचं उतराई व्हायची माझी इच्छा आहे.

यातून आपण खचितच शिकण्यासारखं आहे.

..७..

संत आले महीवर ।
त्यांसी काय हा जोजार ।।१।।

त्यांसी जन्म मृत्यू काय ।
जगासाठी धरिला देह ।।२।।

आम्ही पतित दुर्धर ।
आम्हांसाठी अवतार ।।३।।

दास म्हणे संतचरणी ।
मज टाका ओवाळुनी ।।४।।

– श्री गोंदवलेकर महाराज

महीवर – पृथ्वीवर, जोजार – त्रास/कष्ट/ओझे

(ट्रॅक नं. ००८)

माणसाचा बराचसा परमार्थ हा त्याच्या मनाचा आणि मनावर अवलंबून असलेला आहे. म्हणून या मनाला अनुकूल करून घेऊन आपल्या उद्धारासाठी त्याची मदत घेणं, तसं अपरिहार्यच आहे. म्हणूनच या दुर्मीळ अभंगामध्ये श्री विश्वनाथ महाराज मनाचाच अनुनय करत आहेत. तोही परमार्थाच्या बाबतीत अत्यंत उपयोगी पडणाऱ्या सत्संगाच्या संदर्भात. तसं पाहिलं तर, संतसंगाइतकी आपल्या प्रगतीला उपकारक ठरणारी दुसरी गोष्टच नाही. म्हणून विश्वनाथ महाराजांनी मनाला विनवणी केली आहे की, प्रयत्नपूर्वक या सत्संगात रहा. आजूबाजूला जावंसं वाटलं तर , लक्षात ठेव की, तो आडमार्ग आहे, अहिताचा आहे. ज्या वासनेमुळं आणि कर्ममुळं मनुष्य बांधला जातो, दुःखात पडतो, त्यातून शिताफीनं सुटण्याचा मार्ग सापडतो, तो सत्संगातच.

वास्तविक, वासना आणि कर्म ही दोनही तशी अपरिहार्यच आहेत. आपण बेसावध राहिलो तर, ती आपली अपरिमित हानीही करतात. पण सावध राहिलो आणि वासना निर्मळ झाली, शुद्ध झाली आणि कर्म निष्काम झाली तर, तीच वासना आणि कर्म आपल्याला भगवंताची प्राप्तीसुद्धा घडवून देतात, लाभदायक ठरतात आणि सावध राहून हे हित कसं साधावं, हे संतसंगातच कळतं.

म्हणून सत्संगात राहण्याची श्री विश्वनाथ महाराजांनी मनाला केलेली प्रार्थना मोलाची आहे.

..८..

संतसंगतीचा लाभ घेई मना ।
नको आडराना जाऊ कोठे ।।१।।

आडमार्गी जाता दु:ख होई जीवा ।
आठविशी देवा काय गोडी ।।२।।

म्हणोनी धरावा संग सज्जनाचा ।
केलेल्या कर्माचा मिटे भोग ।।३।।

म्हणे विश्वनाथ वासना ओढाळ ।
होई ती निर्मळ संतसंगे ।।४।।

– श्री विश्वनाथ महाराज

_____
ओढाळ – स्वैर, अनिर्बंध

(ट्रॅक नं. ००९)

माणसाचा बराचसा व्यवहार शब्दमय आहे. इतका की, तो शब्दमय आहे हे सांगायलासुद्धा पुन्हा शब्दच लागतात. साहजिकच माणसानं या शब्दांचा विचार किती गांभीर्यानं आणि किती जिव्हाळ्यानं करायला हवा ! पण तसं घडताना फारसं दिसत नाही. त्यामुळं माणसाची होणारी हानी ही उघडच आहे.

या सा-या शब्दांच्या विश्वाविषयी माणसाला जागरूक करणारं हे पद, बाळेकुंद्रीचे थोर सत्पुरुष श्री पंतमहाराज यांचं आहे. ते सुचवतात की, जर या शब्दांकडं योग्य लक्ष दिलं गेलं नाही तर, हे शब्द मोठा घोटाळा करू शकतात. माणसाची सारी पापपुण्य, त्याचे सारे बंधमोक्ष, सारे धर्माधर्म, इतकंच काय गुरुशिष्यसुद्धा याच शब्दांच्या पकडीत सापडलेले आहेत. म्हणून शब्दांचा योग्य वापर जरूर करावा पण त्यांच्या घोटाळ्यात अडकू नये आणि वेळी शब्दांच्या पलीकडं जायचीसुद्धा तयारी ठेवावी. हे साधकाला उपयोगी ठरेल, असं वाटतं.

..९..

सर्व शब्दांचा घोटाळा ।
टाकुनि होई रे मोकळा ।।१।।

पापपुण्य शब्दापाशी ।
धर्माधर्माच्या या राशी ।।२।।

बंध मोक्ष शब्दमहिमा ।
शब्द जीव मिळे ब्रह्मा ।।३।।

गुरुशिष्य शब्दासाठी ।
शब्दजनित विश्वरहाटी ।।४।।

शब्द गिळुनी नाचे दत्त ।
सदा स्मरे अवधूत ।।५।।

– श्री पंत महाराज

(ट्रॅक नं. ०१०)

गुरू हे कुठल्याही परमार्थमार्गात दीपस्तंभासारखे आहेत. श्री दत्तात्रय हे गुरुपदाचं प्रतीकात्मक दैवत म्हणूनसुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यामुळं कुठल्याही पंथाच्या गुरुविषयक भावनांचं श्री दत्त अवधूत हे परम आदराचं स्थान आहेत. गुरू करण्याच्या आणि गुरूंकडून काय शिकावं, या विद्येचेही ते गुरूच होत.

त्याच श्री दत्तगुरूंचा अवतार असणारे श्री माणिकप्रभू हे मोठे दत्तभक्त आहेत. त्यांची दत्तनिष्ठा या पदातून व्यक्त झालेली आहेच. पण त्यानिमित्तानं कोणत्याही गुरूंचं खरं स्वरूप, कर्तृत्व काय असतं आणि ते शिष्याच्या जीवनात नक्की काय परिवर्तन घडवतात, हेसुद्धा या पदात मार्मिकपणे आलेलं आहे. त्यातून कोणत्याही पंथाच्या गुरुनिष्ठ साधकालाही शिकण्यासारखं आहे.

..१०..

श्री गुरु माझा दत्त दयाघन रे ।।धृ।।

अंतर चालक त्रिभुवन पालक ।
सकलांसी जीवन रे ।।१।।

अखंड अगोचर व्याप्त चराचर ।
शाश्वत चिद्घन रे ।।२।।

माणिकदासासी मिळविले स्वरूपासी ।
देऊनि उन्मन रे ।।३।।

– श्री माणिक प्रभू

(ट्रॅक नं. ०११)

श्री रामरायाला उद्देशून श्री गोंदवलेकर महाराज यांनी या पदामध्ये केलेली प्रार्थना अनेक दृष्टींनी मोलाची आहे. ते म्हणतात, तुझंच रूप माझ्या ध्यानामनात राहू दे आणि त्याचबरोबर माझ्या वाणीलाही तुझ्याच नामाची गोडी लागू दे. रामरायाची प्राप्ती होण्यासाठी मला संतसत्पुरुषांच्या पायाची धूळ होऊ दे. रामाच्या प्राप्तीपुढे मला पैसा, कीर्ती, सुखोपभोग या कशाचीही अभिलाषा नाही. रामाच्या प्राप्तीसाठी कुठल्या ब्रह्मज्ञानासारख्या प्रतिष्ठेच्या साधनाचीसुद्धा मला गरज वाटत नाही, असं ते म्हणतात. त्यांचं हे सारं मागणं साधकांना लक्षात ठेवण्यासारखं आहे.

अखेर तर ते म्हणतात, तुझ्या नामाचंच साधन माझ्याकडून घडू दे. तेच नाम माझ्या अंतरंगात दृढ होऊ दे. यातून भगवंतासाठी लौकिक गोष्टी तर सोडाच पण, मोठमोठ्या आध्यात्मिक साधनांच्यासुद्धा मोहात पडू नये. उलट साध्या सोप्या नाममार्गात राहायची त्यांच्यासारख्या सिद्ध पुरुषांची जी मनाची तयारी आहे, त्यातून आपल्यालाही बरंच काही शिकता येण्यासारखं आहे.

..११..

तुझे रूप ध्यानी राहो माझे मनी ।
रामनाम वाणी वदो सदा ।।धृ।।

तुझे चरणासाठी संतांचा हा रज ।
करुनि ठेवी मज रघुनाथा ।।

मज नको स्वर्ग इंद्रही भुवन ।
कीर्ती आणि धन नको मज ।।

नको मज साधन मोठे ब्रह्मज्ञान ।
राहो समाधान सर्वकाळ ।।

तुझे नामी गोडी लावावी आवडी ।
दास म्हणे जोडी द्यावी मज ।।

– श्री गोंदवलेकर महाराज

जोडी – आवड, लाभ, प्राप्ती

(ट्रॅक नं. ०१२)

एकोणिसाव्या शतकातील नगरचे थोर सत्पुरुष श्री जयरामनाना महाराज, माणसाचं खरं शहाणपण कशात आहे आणि ते मिळवण्याचा मार्ग कोणता आहे, ते इथं सांगत आहेत. हे शहाणपण सदैव शाश्वत समाधानात राहण्यात आहे आणि त्यासाठी सत्पुरुषांचा सहवास हा मार्ग होय.

हे स्पष्ट करताना ते म्हणतात, माणसाला सदैव चिंता, असंतोष यांनी जो त्रास होतो त्याचं कारण मनाची काही ठेवण हे आहे. त्यातलाच एक प्रकार म्हणजे, जे आहे त्यात समाधान नसणं आणि जे नाही त्यातच ते समाधान आहे, असं सारखं वाटत राहणं. त्यामुळं जे आहे ते कसं चुकेल, टळेल आणि जे नाही ते कसं मिळेल, या व्यापात माणूस अडकतो.

म्हणून जे आहे त्याचा वापर किंवा स्वीकार करणं आणि जे नाही त्याच्या आसक्तीचा त्याग करणं, हे त्याच्या हिताचं ठरतं. याचबरोबर मनाला विधायक मूलगामी वळणं देणाऱ्या, बोलावं तसं चालावं, या तत्त्वाच्या आचरणानं आपले प्रपंच – उद्योग शक्यतो निर्विषय राखण्यानं तसंच इतरांसाठी झिजण्यानं, माणसाला आहे त्या ठिकाणी आनंद मिळेल, हे या पदातून कळून येतं.

..१२..

आहे त्याचा भोग , नाही त्याचा त्याग ।
चिंतेचा प्रसंग , आणू नको ।।१।।

सभेमाजी जैसा , तैसा घरामाजी ।
संतोषाशी राजी , राखी सदा ।।२।।

कधीच उद्योग , विषयी नसावे ।
प्रसंग सोसावे , सर्वत्रांचे ।।३।।

जयराम विठ्ठल , शहाणा होऊ पहासी ।
तरी साधूपाशी काळ घाली ।।४।।

– श्री जयरामनाना महाराज

(ट्रॅक नं. ०१३)

माणसाला मृत्यू अपरिहार्य आहे. पण असं कळूनही, साधारणपणे त्याला तो नकोसाही आहे. उलट सर्वसाधारण माणसाला मृत्यूच काय मृत्यूचा विचारसुद्धा नकोसा वाटतो. अस्वस्थ करणारा ठरतो. इतकंच काय, मृत्यूच्या मधूनमधून येणाऱ्या विचारानं, कुणाकुणाच्या बाबतीत घडणाऱ्या मृत्यूच्या दर्शनानंसुद्धा मनुष्य हादरून जाऊन आजचं जीवनही भयग्रस्त अवस्थेत घालवतो! याची अनेक कारणं आहेत. त्यातही महत्त्वाचं कारण हे आहे की, मृत्यू हा जीवनाचा एक भाग आहे, सृष्टीची एक व्यवस्था आहे, हे मान्य करायला आपण मनापासून तयार नाही आणि दुसऱ्या बाजूनं मृत्यूच्या विचारानं निर्माण होणारं भय नाहीसं करण्याचा उपायसुद्धा आपल्याला माहीत नाही.

थोर संत, श्री ब्रह्मानंद हे मृत्यूच्या स्वरूपावर आणि त्याच्या व्याप्तीवर महत्त्वाचा प्रकाश या अभंगामध्ये टाकीत आहेत. तसंच त्या बाबतीतली नामाची थोरवीही सांगत आहेत. हा अभंग आपण त्यातल्या अर्थाशी तादात्म्य होऊन म्हटला तर, या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल आपल्याला दिलासा खचितच मिळेल.

..१३..

अहो प्रभु काल बडो बलकारी ।
जांको भोजन है नरनारी ।।धृ।।

ब्रह्मा रुद्र इन्द्रगण खाये, खाये दैत्य हजारी ।
बडे बडे पृथ्वी के राजा खाये जिमि तरकारी ।।१।।

सूरज चाँद सितारे नदियाँ सागर पर्वत भारी ।
कालचक्र में सब पिस जावें अपनी अपनी बारी ।।२।।

जलचर नभचर वनचर भूचर लघुदीर्घ तनधारी ।
सबही जीव काल के मुख में घूम रहे दिनचारि ।।३।।

नाम तुम्हारो अमर निरंतर कालपाशभयहारी ।
'ब्रह्मानंद' शरण में तेरी कीजिये भवजल पारी ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

जिमि तरकारी – जणू भाजीपाला

(ट्रॅक नं. ०१४)

माणूस व्यवहारात बऱ्याच गोष्टी सुरुवातीला शिकतो ते इतरांचं पाहून, अनुकरण करून. परमार्थातसुद्धा त्या पद्धतीनं शिकायला थोडा वाव आहे, असं म्हणता येईल. थोडा अशासाठी म्हणायचा की, प्रपंच दृश्याचा आहे, बाह्यांगाचा आहे. त्यामुळं त्यातलं अनुकरण म्हणजे – पहाणं सोपं, त्यानुसार बाह्यांगानं काही करणं सोपं.

परमार्थ मुळात अंतरंगाचा, त्यातही आपण तो शिकतो तो त्यातल्या आचार्यांकडून, सत्पुरुषांकडून! त्यामुळं तिथं शिकताना अनुकरण करायचंच झालं तर बाह्यांगाचं करून चालत नाही तर, त्यातल्या अंतरंगाचं, मनाच्या ठेवणीचं, वृत्तीचं करावं लागतं. अंत:करण कळणं कठीण असलं तरी, अभंगातून संतांचं अंतरंग व्यक्त होत असल्यानं, त्यांच्या अभंगातून ते शिकता येतं. या जगामधले सारे लोकव्यवहार करूनसुद्धा, वृत्तीनं त्यात न गुंतता, अतीत म्हणजे, त्या पलीकडं, संत कसे राहतात, ते या अभंगात अत्यंत प्रासादिक भाषेत व्यक्त झालेलं आहे. इतर कशात तर नाहीच पण, आपल्या नावातसुद्धा आपण कसं गुंतू नये, हे श्री माणिकप्रभूंकडून, या पदात शिकावं असंच आहे.

..१४..

आम्ही पायी येऊ जाऊ ।
परी पायातीत राहू ।।धृ।।

डोळ्याने रूप पाहू ।
परि डोळ्यातीत होऊ ।।१।।

जिव्हेने गाऊ ध्याऊ ।
परि जिव्हातीत राहू ।।२।।

आमचे नाव माणिकभाऊ ।
परि नामातीत होऊ।।३।।

– श्री माणिक प्रभू

(ट्रॅक नं. ०१५)

माणसाच्या जगण्याला दोन अंगं आहेत. एक शरीराचं आणि दुसरं मनाचं. माणूस दोन्ही पातळीवर जगतो. जगताना मोठ्या गुर्मीत, बेफिकिरीत जगतो. कारण त्याला वाटतं, या शरीर – मनावर आणि जगतो त्या जगावरही, आपली सत्ता चालते. पण विचार केला तर लक्षात येतं, तन म्हणजे शरीर काय, आणि मन काय, दोनही माणसाच्या हातात नाहीत. त्यामुळं त्याचा हा तोरा फोल आहे. पण स्वत:च्या तोऱ्यातला फोलपणा त्याच्या स्वत:च्या लक्षात येत नसला तरी, इतर जगाला या माणसाचं अंतर, म्हणजे अंतरंग, दिसतं आणि त्याची ही फजिती, हा फोलपणा इतरांच्या लक्षात येतो.

दुर्दैवाची गोष्ट अशी की, आपल्या हातात स्वत:चं तनमन नसलेला हा माणूस इतरांना मात्र उपदेश करतो, सुधारायला जातो. स्वत:ची वृत्ती स्थिर राहील की नाही, याची क्षणभराचीसुद्धा खात्री देऊ न शकणारा माणूस, जगापुढं किती वल्गना करतो ! म्हणून या अभंगात श्री गोंदवलेकर महाराज शेवटी असा सल्ला देतात की, आता जगाची चिंता सोडा, जगापुढं प्रौढी मिरवायची सोडा आणि स्वत:चा उद्धार कसा होईल, याची चिंता करा. हा सल्ला साधक म्हणून आपण खरोखरच लक्षात घेण्यासारखा आहे.

..१५..

अपुले तनुमन नाही हाती ।
जन अंतर हे पाहाती ।।धृ।।

अपुला न लगे ठाव ।
शेखी मिरवी अहंभाव ।।१।।

आपुली नाही स्थिर वृत्ती ।
काय होईल कैसी गती ।।२।।

दीनदास म्हणे आता ।
आपुली आपण करा चिंता ।।३।।

– श्री गोंदवलेकर महाराज

अंतर – (आपले) अंतरंग, मन

(ट्रॅक नं. ०१६)

आत्मपरीक्षण हे परमार्थातलं प्राथमिक पण अत्यंत महत्त्वाचं साधन आहे. आपण स्वत:ला शहाणे, कर्तबगार, विद्वान, सद्‌गुणी, साधनेत पुढं गेलेले, असं समजत आहोत तोपर्यंत काही खरं नाही. स्वत:चे अवगुण दिसू लागणं ही परमार्थातली पहिली पायरी आहे, असं श्री ब्रह्मचैतन्य महाराज म्हणत,ते कायम लक्षात ठेवण्याजोगंच आहे. त्यांचेच थोर शिष्य श्री आनंदसागर महाराज या अभंगात परखडपणे म्हणतात की, माझ्या अपराधांचा ढीग पहाता मी एखाद्या दगडासारखा निर्बुद्ध आणि सुधारणेपलीकडचा जन्मलो आहे असं वाटतं. माझी स्थिती अशी आहे – मुखी नाम नाही, मन अस्थिर, वृत्ती सतत विषयांच्या बाजारात रमलेली, मन भ्रमात सापडलेलं – अशा अवस्थेत भगवंताची ओळख व्हायला आणि चित्तात भगवंत स्थिर व्हायला करायचा उपायसुद्धा माझ्या हातात नाही.

हे सारं, खरं पाहिलं तर, आपल्याला लागूच आहे. पण अभंगात पुढं शिकण्यासारखं हे की, ही परिस्थिती लक्षात आल्यावर श्री आनंदसागर सद्‌गुरूंना शरण गेले, यातून जर आपण मनोमन शिकू आणि तसं करू तर त्यांच्यासारखीच आपलीही स्थिती पालटू शकेल.

..१६..

बहु अपराधी जन्मलो पाषाण ।
मुखी नारायण नाम नाही ।।१।।

नाम नाही मुखी मन नाही स्थिर ।
विषयी तत्पर सर्वकाळ ।।२।।

सर्वकाळ वृत्ती हिंडती बाजारी ।
आता कैसे हरी आकळावे ।।३।।

कैसी आकळे वृत्ति कैसी जाय भ्रांति ।
कैसी राममूर्ति चित्ती वसे ।।४।।

चित्ती वसे ऐसा घडावा उपाय ।
म्हणुनि सद्‌गुरुपाय धरियेले ।।५।।

धरियेले पाय ते माझे जीवन ।
अनन्य शरण हरि पायी ।।६।।

– श्री आनंदसागर महाराज

(ट्रॅक नं. ०१७)

प्रपंचाचा रेटा हा इतका विलक्षण आहे की, त्यातून भल्याभल्यांची सुटका होत नाही, असं दिसतं. दृश्याची ही सततची ओढ बाजूला ठेवून नामासारख्या – भगवंतासारख्या अदृश्य आणि शाश्वत देवात गुंतायला मन तयार होण्याचा योग महादुर्मीळ म्हटला पाहिजे. सत्संग, पूर्वपुण्याई, आत्यंतिक दु:ख, तीव्र जिज्ञासा अशासारख्या एखाद्या कारणानं तशी बुद्धी कधीतरी माणसाला होते पण, या प्रपंचाच्या मायाजालाचं वैशिष्ट्य हे की, या अशा जाग्या होणाऱ्या आणि सन्मार्गाला लागू पाहाणाऱ्या मनाच्या मानगुटीवर ते मायाजाळ पुन्हा हळूच बसतं आणि पुन्हा त्याला या आशा – निराशेच्या आणि द्वंद्वाच्या फसव्या चक्रात अडकवतं.

अनेकांना येणाऱ्या या अनुभवाच्या संदर्भात संतश्रेष्ठ श्री तुकोबा या अभंगामध्ये भगवंताला प्रार्थना करतात की, माझ्या मनात मोठ्या भाग्यानं उपजलेला तुझ्या प्राप्तीचा संकल्प आता तुझ्या कृपेनंच सिद्धीला जाईल असं कर, मोठ्या भाग्यानं उमटलेले तुझे पाय माझ्या चंचल चित्तात स्थिर होतील असं कर आणि पुन्हा प्रपंचात अडकण्याची दुर्बुद्धी माझ्या मनात निर्माण होणार नाही, एवढी कृपा कर.

असं वाटतं की, साधकांनीसुद्धा आपापल्या परीनं ही प्रार्थना करीत राहाणं, हिताचं ठरेल.

..१७..

दुर्बुद्धी ते मना ।
कदा नुपजो नारायणा ।।धृ।।

आता मज ऐसे करी ।
तुझे पाय चित्ती धरी ।।१।।

उपजला भावो ।
तुमचे कृपे सिद्धी जावो ।।२।।

तुका म्हणे आता ।
लाभ नाही या परता ।।३।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०१८)

श्री गोंदवलेकर महाराज यांची या पदातली प्रार्थना अत्यंत आर्त आहे. पण ती अंतर्मुख व्हायला लावणारीही आहे. कारण ते यात म्हणतात, माझ्या हातून संध्यास्नान, तीर्थाटन, रामसेवा, सत्संग यातलं काहीच घडलं नाही. तेव्हा आता रामराया तूच मला तार. अर्थात लौकिक अर्थानं यांतलं काही सत्कर्म त्यांच्या हातून घडलं नसेल असं मानणं शक्य नाही.

म्हणून इथं त्यांना असं अभिप्रेत दिसतं की, अशी सत्कर्मं घडतात खरी, पण ती खऱ्या अर्थानं घडत नाहीत. म्हणजे उदाहरणार्थ, मनुष्य तीर्थयात्रेला जाऊन येतो पण, त्याच्या मनातला भगवंत काही त्या यात्रेनं जागा होत नाही की त्याच्या अंतरंगात कुठला विधायक बदल होत नाही. तीच गत इतर साधनांचीही असू शकते.

म्हणून त्यांनी आर्ततेनं केलेली प्रार्थना आपणही रामरायाला करण्याजोगीच आहे.

..१८..

गेला गेला जन्म वाया ।
तारी तारी राम राया ।।१।।

नाही घडले संध्यास्नान ।
नाही केले तीर्थाटन ।।२।।

नाही घडली तुझी सेवा ।
ऐसा पातकी मी देवा ।।३।।

नाही घडला संतसंग ।
कामक्रोधी सदा धुंद ।।४।।

दास म्हणे तुम्हा लोका ।
त्याच्या तोंडावरी थुंका ।।५।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०१९)

आपल्याला अत्यंत जवळ असलेली गोष्टच अनेकदा आपल्याला लांबची आणि दुष्प्राप्य होऊन बसते. याचं उत्तम उदाहरण म्हणजेच आपल्या हृदयातला भगवंत ! बाह्यविषयांच्या आकर्षणामुळं म्हणा, भ्रमामुळं म्हणा, व्यर्थ शब्दजंजाळामुळं म्हणा, इतका सुलभ, इतका जवळचा असलेला भगवंत आपल्याला दुरावतो आणि त्याहीपेक्षा दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, याचं आपल्याला वाईटसुद्धा वाटत नाही.

नेमकी याचीच खंत श्री रंगनाथ स्वामींच्या या संपादित पदामध्ये अतिशय नेमक्या शब्दांत आणि प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. हे पद नित्य म्हणून, तो भाव आपल्या हृदयात प्रगट झाला तर, पुढं तळमळ लागून भगवंताची भेट नक्कीच सुलभ होईल, असं वाटतं.

..१९..

कशी खंत वाटेना ।
याची खंत वाटेना । कशी खंत वाटेना ।।धृ।।

हृदयी असता हरी भेटेना ।
याचि खंत वाटेना ।।१।।

जन्मोजन्मान्तरी अंतरला हरी ।
विषय भोगी मन विटेना ।।२।।

दिवसो दिवसे लोटले श्रवणी श्रवण दाटले ।
भ्रांती पडदा अजुनि फाटेना ।।३।।

अनुतापे तापुनी शुद्ध सत्त्व होऊनी ।
निज रंगाचा ठसा उमटेना।।४।।

– श्री रंगनाथ स्वामी

(ट्रॅक नं. ०२०)

माणसानं परमार्थात कितीही प्रकारचे कष्ट केले, कितीही प्रकारची साधनं केली तरी, त्याला आटोक्यात आणणं कठीण जातं, ते त्याचं मन आणि त्याहीपेक्षा खोल संस्कार घेतलेलं त्याचं चित्त. मनाशी दोन हात करायचे प्रयत्न व्यर्थ ठरले की, मार्ग उरतो तो सर्वसमर्थ भगवंताला शरण जाण्याचा. श्री तुकोबा मोठ्या तळमळीनं तो मार्ग स्वीकारून श्री विठोबाला या पदात म्हणतात, काही करून माझे चित्त तुझ्या पायाशी राहील असं कर. मनाच्या अडकण्याच्या, गुंतण्याच्या, सतत आशेच्या तावडीत सापडण्याच्या वृत्तीमुळं साधकाच्या जीवनात सतत दुःख, तळमळ, निराशा याचा अंधार पसरतो. म्हणून विठोबानं माझं चित्त आता त्याच्या पायी ठेवून, दंड ाला धरून या भवसागरातून मला ओढून बाहेर काढावं, आणि जीवनातला हा अंधार दूर करून आनंदाचा प्रकाश जीवनात पसरवावा, अशी विनवणी तुकोबा या पदात करतात. विठोबाच्या पायावर डोकं ठेवून ते म्हणतात, तुम्हीच आता माझी काळजी घ्या आणि मला तुमच्या पायाशी ठेवा.

आपणही आपल्याआपल्या उपास्य दैवताला, सद्गुरूंना अशी प्रार्थना मनोमन करावी, असं म्हणावसं वाटतं.

..२०..

माझे चित्त तुझे पायी ।
राही ऐसे करी काही ।
धरोनिया बाही ।
भव तारी दातारा ।।१।।

चतुरा तू शिरोमणी ।
गुण लावण्याची खाणी ।
मुकुट सकळा मणी ।
धन्य तूचि विठोबा ।।२।।

करी या तिमिराचा नाश ।
उदय होऊनि प्रकाश ।
तोडी आशा पाश ।
करी वास हृदयी ।।३।।

पाहे गुंतलो नेणता ।
माझी असो तुम्हा चिंता ।
तुका ठेवी माथा ।
पायी आता राखावे ।।४।।

– श्री तुकोबा

बाही – हाताला

(ट्रॅक नं. ०२१)

नामाचं माहात्म्य सर्व संतांनी एकमुखानं आणि उच्चरवानं गायलेलं आहेच. हरिपाठासारख्या छोट्याछोट्या ग्रंथांपासून, गाथा दासबोधासारख्या मोठमोठ्या ग्रंथांत ते माहात्म्य आहेच. तरीही याच नामाचं महत्त्व सांगताना श्री रामदास स्वामींनी नामाच्या सामर्थ्याचे काही वेगळेच मुद्दे इथं दिले आहेत.

मृत्यूसारख्या महाभयाचं निवारण, चित्तशुद्धी, बुद्धीचं स्थैर्य, मोठमोठ्या दोषांपासून मुक्तता आणि सत्संग मिळवायला नामच कारणीभूत आहे, असं स्वामींनी या अभंगात सांगितलेलं आहे. आणि शेवटी नामाचं एक फार मोठं वैशिष्ट्य सांगताना ते म्हणतात की, नाम हे केवळ साधकाचं महत्त्वाचं साधन नसून, सिद्धावस्थेतसुद्धा नाम हेच साधन आहे आणि प्रगतिपथावर असणाऱ्या साधकांनी हे लक्षात घेण्यासारखं आहे, असं वाटतं.

..२१..

नामचि कारण रे। (सखया)
महाभय नामे निवारण रे ।।१।।

नामे होय चित्त शुद्धी ।
नामे होय दृढ बुद्धी ।।२।।

नामे महादोष जाती ।
पुढे संतांची संगती ।।३।।

रामदास सांगे खूण ।
नाम सिद्धांचे साधन ।।४।।

– श्री समर्थ रामदास स्वामी

(ट्रॅक नं. ०२२)

नि:सीम गुरुभक्त आणि रामरायाचे श्रेष्ठ उपासक श्री आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर यांचं संक्षेपानं इथं घेतलेलं पद आपण हे आपलं जीवन कोणत्या मनोभूमिकेनं जगावं याचा जणू धडाच आपल्याला देतं. हे पद जसं राघोबाला म्हणजे रामाला उद्देशून आहे, तसंच ते त्यांचे गुरु राघोबा म्हणजे रघुनाथस्वामी यांनाही उद्देशून आहे. त्यामुळं आपल्या दृष्टीनंही आपल्या आपल्या गुरूंना किंवा दैवतालाही लागूच आहे.

प्रपंच न सोडता प्रपंचाची चिंता सोडून आपण आता भक्तिमार्गाला कसे लागलो आहोत, ते धृपदात स्वामींनी नेमकेपणानं सांगून, प्रापंचिक साधकांना योग्य दिशाच दिली आहे. शेवटी भगवंत सर्वसमर्थ असल्यानं आणि माझ्या प्रत्येक गोष्टीला तो साक्षी असल्यानं, माझ्या हृदयातली सारी व्यथासुद्धा तो जाणतो आणि दूर करू शकतो, याची मला खात्री असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या प्रपंच व्यवहारात एका बाजूला तू मला जसा ठेवशील, जिथं ठेवशील, तसा – तिथं मी राहीन, जीवनात जे जे घडवशील ते ते मी आनंदानं पत्करीन आणि दुसऱ्या बाजूला माझं सर्वस्व मी तुला वाहीन आणि तुझ्या नामात अखंड राहण्याचा मी प्रयत्न करीन, असा दृढ निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. अशा साऱ्या भूमिकेनं जगल्यानं अखंड आनंद माझ्या हाती आला आहे, अशी खूणही साधकांना त्यांनी देऊन ठेवली आहे. त्यामुळं हे सारंच पद मोठं मार्गदर्शक आणि नित्य म्हणण्यात ठेवावं असं झालं आहे, हे नक्कीच.

..२२..

रे राघोबा लागलो तुझिया पंथा ।
सर्व सोडोनि संसारचिंता ।।धृ।।

आता जाणशील ते तू करी ।
सुखे तारी बा, अथवा मारी ।।
मोक्ष देई का, घालि संसारी ।
तुज धरिले वृढ अंतरी ।।१।।

जे जे करिशी ते ते पाहू ।
जेथे ठेवशील तेथे राहू ।।
सर्व तन मन तुजला वाहू ।
नाम तुझेचि सर्वदा गाऊ ।।२।।

सर्वसाक्षी सर्वही सत्ता ।
सर्व जाणशी तू अनंता ।।
माझे हृदयीची सर्व व्यथा ।
आला आनंद अक्षय हाता ।।३।।

– श्री आनंदमूर्ती

(ट्रॅक नं. ०२३)

श्री गोंदवलेकर महाराज यांनी सांगितलेल्या पद्धतीनं भजनाचं साधन करून लहान वयात मुक्तावरथेला पोचलेले श्री आनंदसागर, हे श्री महाराजांचे एक पट्टशिष्य होत. त्यांच्या इथल्या पदातून त्यांची गुरूवरची, नामावरची, भगवंतावरची दृढ श्रद्धा व्यक्त झालेली आहे. जगाची आस टाकणाऱ्या भक्ताच्या साहाय्याला भगवंत धावून येतोच आणि त्याची लाज सांभाळतो, हा दृढविश्वास त्यांनी शब्दाशब्दांत व्यक्त केलेला आहे. अशा या भक्तवत्सल भगवंताचं नाम हे, त्या भगवंताचं व्यक्त व्हायचं ठिकाण असून, त्याची कल्पना सामान्य माणसाला येत नाही. गुरुकृपेनं नामाच्या महत्त्वाची ही कल्पना आपल्याला येईल, याची त्यांना खात्री वाटते. म्हणून ते अखंड गुरूच्या पायी राहू इच्छितात. भगवंतावाचून मला कुणीही तारणहार नाही, हा अनन्यभाव, या पदात कसा एकवटला आहे ते पाहाण्याजोगं आहे.

..२३..

आता काही नाही हरीविण मज ।
तोचि माझी लाज सर्व रक्षी ।।१।।
लाज सर्व रक्षी अंतराचा साक्षी ।
व्यापुनी सर्व देशी उरलासे ।।२।।
उरलासे त्याचे नाम हे ठिकाण ।
संतसाधुजन जाणताती ।।३।।
जाणताती पूर्ण स्वात्मानुभवी ।
नामाची पदवी कोणा नाही ।।४।।
ऐसे नाम कळे सद्‌गुरूचे दासा ।
हरीचा भरवंसा गुरुपायी ।।५।।

– श्री आनंदसागर महाराज

पदवी – श्रेष्ठत्व,

(ट्रॅक नं. ०२४)

माणसाचं मन मोठं विचित्र आहे. त्यानं एकदा एखादी गोष्ट मनात धरून ठेवली की ठेवली. शुभाशुभ, शकून – अपशकून यांची तीच अवस्था आहे. काही संस्कारांनी म्हणा किंवा काही इतर कारणांनी म्हणा, एकदा मनाला वाटलं की, एखादी घटना घडली म्हणजे आता आपलं काही खरं नाही, आता आपलं नुकसान ठरलेलंच आहे. तर ते त्या मनातून काढणं भल्याभल्यांना जमत नाही. उलट असल्या निराशेच्या आणि विघातक विचारांनी पुढं चुकीच्या कृती घडून, त्या शुभाशुभ गोष्टींनी घडणाऱ्या काल्पनिक नुकसानापेक्षा जास्ती नुकसान, अशा चुकीच्या कृतीतून घडून येतं. म्हणून माणसाला या अकारण विचारांपासून मुक्त करणं हाच उत्तम उपाय होय.

श्री तुकोबा या अभंगामध्ये सुरुवातीलाच सांगतात की, खऱ्या भक्ताला भगवंताचं स्मरण, भगवंताचे चरण मनामध्ये आठवणं हेच शकुनाचं आहे. त्यानं अपशकुनाचा आणि अशुभाचा विचारसुद्धा मनात आणू नये. भगवंताचं स्मरण सदैव ठेवणाऱ्यानं श्री तुकोबांचा हा अनुभवसिद्ध विचार लक्षात ठेवून अगदी निश्चिंत असावं आणि आपली साधना, आपली कर्तव्यं अगदी आनंदात करावीत.

..२४..

अवघा तो शकुन ।
हृदयी देवाचे चरण ।।१।।

येथे नसता वियोग ।
लाभा उणे काय मग ।।२।।

संग हरिच्या नामाचा ।
शुचिर्भूत सदा वाचा ।।३।।

तुका म्हणे हरिच्या दासा ।
शुभकाळ अवघ्या दिशा ।।४।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०२५)

दुर्दैवानं अनेकांना आपल्याला लाभलेल्या मनुष्य जन्माचं मोलच कळत नाही. त्यांना वाटतं की, त्यात काय एवढं विशेष आहे ? पण हिऱ्याचं मोल ओळखायला, ओळखणारा जसा पारखी लागतो आणि सामान्य माणसाला मात्र साधी ती गार वाटते, त्यातला काहीसा प्रकार मानवी जन्माचं महत्त्व ओळखण्याबद्दल होतो.

त्याचं महत्त्वच न कळल्यानं अमूल्य हिरासुद्धा सामान्य माणूस मातीमोलानं विकून टाकतो, तसा सामान्य माणूस दुर्लभ नरदेह काय आणि त्यातली विलक्षण क्षमता काय, कवडीमोलानं खाण्यापिण्यात, झोपण्यात आणि मौजमजेत उधळतो हे पाहून, कबीरांसारखे सत्पुरुष तळमळतात. कबीरजी या पदात विचारतात, एखाद्या घाण्याच्या बैलासारखे झापडं लावून का जगता ? आणि आनंदाच्या बाबतीत असे दिवाळखोरीत का मरता ? संतांना शरण गेलात, भगवंताची काही ओळख करून घेतलीत, त्याचं काही भजन केलंत, गुणगान केलंत तर, अशी कंगाल व्हायची वेळ येणार नाही. प्रपंचाच्या भुलभुलैयात मायामोहाच्या फसव्या जाळ्यात किती खोट्या आशेनं सुखासाठी झेपावता आणि वस्तुस्थिती कळली, फोलपणा कळला की पस्तावता ! हा अनुभव जमेला धरून आता तरी भगवद्भजनाला लागणार का ? कबीरजींचे प्रश्न, आपण साधकांनी आपल्या मनाला प्रामाणिकपणे विचारावे, हे खरं!

..२५..

भजन बिन बावरे ,
तैने हीरा सो जनम गँवायौ ।।धृ।।
कभी न आयौ संत शरण में ,
ना तै हरि गुण गायौ ।
बह बह मरौ बैल की नाई ,
सोय रह्यौ उठि खायौ ।।१।।
ये संसार हाट बनिये की ,
सब जग सौदा लायौ ।
चातुर माल चौगुना कीन्हौ
मूरख मूल गँवायौ ।।२।।
यह संसार फूल सेमर का ,
सूआ देख लुभायौ ।
मारी चोंच रुई निकसाई ,
मूंडी धुनि पछितायौ ।।३।।
ये संसार माया कौ लोभी ,
ममता महल चिनायौ ।
कहत 'कबीर' सुनो भाई संतों ,
हात कछू नहीं आयौ ।।४।।

– श्री कबीर

सेमर – रुईचा वृक्ष, सुआ – पोपट

(ट्रॅक नं. ०२६)

भगवंताच्या नामाबद्दल आजवर जितकं सांगून झालं आहे, तितकं इतर कुठल्याही साधनाबद्दल क्वचितच सांगितलं गेलं असेल. तरीही ते सांगून संपत नाही आणि संपणारही नाही. कारण नाम प्रत्यक्ष जगताना, आत्मानुभवी संतांना, नामाचे इतके नवे पैलू गवसत असतात की, नामाकडे बघण्याची नवी दृष्टी ते पुन्हा देऊन जातात. असंच नामाबद्दलचं हे पूज्य विश्वनाथबाबांचं पद.

भक्त म्हणजे एक प्रकारे भगवंतासमोर शरणागत व्यक्तीच होय. शरणागत हा कर्तृत्वानं, ज्ञातृत्वानं, भोक्तृत्वानं हरलेला आणि असमर्थच होय. पण हाच असमर्थ शरणागत भक्त, नाम घेता घेता अंतर्बाह्य श्रेष्ठ आणि समर्थ बनतो, तरतो आणि इतरांना तारतोही. भगवंताच्या इच्छेविरुद्ध चालण्यानं आलेली असमर्थता, त्याच्या इच्छेनुसार चालताना समर्थतेत बदलून जाते आणि भक्तीचं खरं स्वरूप कळतं. त्यामुळं नाम हेच सर्व सत्कर्मांचा पाया आहे आणि नाम घेणारा कधीही वाया जाणार नाही, यांची श्री विश्वनाथ महाराजांनी दिलेली खात्रीही आपल्याला पटते.

..२६..

हरि नाम मुखी , हरि नाम मुखी ।
हरि करी सुखी , नाम घेता ।।१।।

हरिच्या नामाने , तरले साक्षात ।
भक्तीने समर्थ , झाले जगी ।।२।।

सत्य कर्मासाठी , हाचि मूळ पाया ।
नाम घेता वाया , कोण गेला ।।३।।

म्हणे विश्वनाथ , हरि हरि बोला ।
हरिकृपे चाला , कळे भक्ती ।।४।।

– श्री विश्वनाथ महाराज

(ट्रॅक नं. ०२७)

माणूस परमार्थ करीत नाही असं नाही. त्याच्या त्याच्या कल्पनेप्रमाणं तो पुण्यकर्म करायचा प्रयत्न करतो, भक्तीची कामं करतो, पूजाअर्चा करतो, तीर्थयात्रा करतो. पण बरेचदा हे सारं करूनही तो मुक्त होत नाही, अखंड आनंदाचा अनुभव घेऊ शकत नाही, याचं कारण काय असावं ? आणि जर असं घडणार असेल तर कष्ट, उपाय खूप झाले पण स्वहित साधलंच नाही, असं म्हणावं लागेल नाही का? मग परमार्थासाठी मांडलेला हा पुण्य–भक्ती–तीर्थयात्रा ही साधनं हा प्रपंचच झाला आणि तो वायाच गेला, असं म्हणावं लागेल.

हे मोठ्या तळमळीनं, संतश्रेष्ठ श्री नरहरी सोनार या अभंगामध्ये म्हणतात. लौकिक अर्थानं सामान्य माणूससुद्धा तीर्थयात्रा, पुण्यकर्म करतो पण, ज्या अर्थानं ती व्हायला पाहिजेत त्या अर्थानं ती होत नाहीत असं इथं अभिप्रेत आहे. म्हणजे असं की, पुण्यकर्म केलं पण त्याचं कर्तृत्व, अहंकार राहिला, सगुणात पूजाअर्चा केली पण, भगवंताचं भान येऊन देहाचं स्मरण कमी व्हायला हवं, ते झालं नाही. क्षेत्रं झाली पण भगवंत भेटला नाही. अशा अर्थानं हे स्वहिताचे म्हणून केलेले सर्व उपाय व्यर्थ गेले. बरं त्यात सुधारणाही जमत नाही. शेवटी श्री नरहरी या पदात, एका गुरुकृपेवरच आता भरवसा उरल्याचं सांगताना म्हणतात, ती गुरुकृपा झाली, तर मात्र जे साधनांनी जन्मात साध्य झालं नाही, ते गुरुकृपेनं क्षणात साधेल.

आपणही हे ओळखून, अंतर्यामी अशा निष्ठेनं जगलो तर, ते उपयोगी ठरेल.

..२७..

काही उपाय चालेना ।
काही स्वहित घडेना ।।१।।

काही केले नाही पुण्य ।
काय जन्मासी येऊन ।।२।।

केली नाही काही भक्ती ।
देही नाही हो विरक्ती ।।३।।

काही केले नाही तीर्थ ।
जन्म गेला अवघा व्यर्थ ।।४।।

व्यर्थ प्रपंच हा केला ।
अवघा शेवटी वाया गेला ।।५।।

गुरुकृपा होय जरी ।
नरहरी क्षणी उद्धरी ।।६।।

– श्री नरहरी सोनार

(ट्रॅक नं. ०२८)

अभंग हा, त्या त्या सत्पुरुषाच्या हृदयाचं जणू प्रतिबिंब असतो. भगवंताच्या प्राप्तीसाठी साधना करताना येणाऱ्या वेगवेगळ्या अवस्था त्या त्या अभंगाच्या रूपानं चित्रित झालेल्या असतात. अभंग म्हणताना, म्हणणाऱ्यानं त्यातल्या अर्थाशी तादात्म्य होऊन तो म्हटला तर ती ती अवस्था त्या त्या म्हणणाऱ्याला येऊ शकते. निदान अशा अवस्थेत असताना, त्याला काही काळासाठी तरी, भगवंताच्या मार्गाला चालण्यातला आनंद अनुभवता येतो.

या संदर्भात, श्री तुकोबा या अभंगात म्हणतात त्याप्रमाणं, ती ती दशा आपल्या अंगी जर आली तर आपलं परिवर्तनच घडतं. देहबुद्धीचा विसर पडतो. अशी स्थिती येणं, हे श्री तुकोबा मोठं भाग्य समजतात. कोणताही अभंग म्हणताना, या अभंगातली भूमिका लक्षात ठेवणं, आपल्याला उपयोगी पडण्यासारखं आहे.

..२८..

कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा ।
चित्त पांडुरंगा झुरतसे ।।१।।

नाठवुनि देह पायांचे चिंतन ।
अवसान ते क्षण नाही मध्ये ।।२।।

काय ऐसा पात्र होईन लाभासी ।
कई हृषिकेशी तुष्टतील ।।३।।

तुका म्हणे धन्य मानीन संचित ।
घेईन नित्यानित्य प्रेमसुख ।।४।।

– श्री तुकोबा

पदवी – श्रेष्ठत्व, अवसान – खंड

(ट्रॅक नं. ०२९)

माणसाचा सारा जीवनप्रवास पाहिला तर, कुठलं ना कुठलं ध्येय गाठण्यासाठी त्याची सतत धावपळ, धडपड चाललेली दिसेल. ते ते ध्येय माणूस गाठीलही. गाठत नाही तो फक्त निर्भेळ आनंदाचा गाव! कारण ही ध्येय गाठणारा 'मी' ध्येय गाठल्यावरही तिथं शिल्लक असतो. इतकंच नव्हे, या आणखी एका यशानं, तो अधिकच बळकट झालेला असतो. तो संकुचित 'मी', साऱ्या आनंदावर पाणी पसरतो, हे निदान इतरांच्या मीपणाच्या वृत्तीवरून तरी, आपल्या लक्षात येऊ शकेल. याउलट, व्यवहारानं येतील ती कर्तव्यकर्मं यथासांग करून, याशिवाय हा 'मी' नाहीसा करायचं ज्याचं ध्येय असेल, त्याला मात्र ते ध्येय गाठलं तर खरा, टिकाऊ आनंद मिळतो. कारण आता 'मी' जाऊन 'तू' किंवा भगवंत आलेला असतो. त्यामुळे कष्ट भले आपले असतील, पण कर्तृत्व, सत्ता, यश सारं भगवंताचं असतं. म्हणून, अशा मी नाहीशा होण्यानं, स्वत:लाही आनंद होतो अन् इतरांनाही. म्हणून 'मी' कसा कळेल अन् मीपणा, अहंभाव कसा जाईल, ही खऱ्या साधकाची तळमळ असते. श्री गोंदवलेकर महाराज यांनीही, या अभंगात भगवंताला उद्देशून इतर काही न मागता, माझा 'मी' आणि मीपण घालवा, अशी अत्यंत आर्ततेनं प्रार्थना का केली आहे, ते समजू शकतं आणि आपल्याला आपल्या साधनेतही ते किती महत्त्वाचं आहे, हे पटू शकतं.

..२९..

मी माझे विसरुनी जाई ।
ऐसे करी माझे आई ।।१।।

मग मी जाईन मरून ।
तुझे पायी स्थिरावीन ।।२।।

तुम्हा जोडू दोन्ही करा ।
एवढे द्यावे रघुवीरा ।।३।।

कृपा करी देवाधिदेवा ।
मज न्यावे तुमचे गावा ।।४।।

मज नको मुक्तिधन ।
माझे हरावे मी पण ।।५।।

दास म्हणे रामराया ।
आता येऊ द्यावी दया ।।६।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०३०)

ब्रह्मानंद हे राजस्थानातील थोर सत्पुरुष या पदामध्ये आपल्याला सावध करून जीवनातल्या नश्वरतेबद्दल विचार करायला सुचवीत आहेत. माणसाला आपली स्वत:ची, आपल्या बरोबरच्या माणसांची, वस्तूंची – त्या शाश्वत आहेत, अनंतकाळ टिकणार आहेत, याची खात्री वाटते. वास्तविक, माणूस स्वत: काय किंवा जगातल्या इतर जड वस्तू काय, कधीच शाश्वत नव्हत्या आणि नाहीत. मग ते बडेबडे राजेरजवाडे असोत नाहीतर मोठमोठ्या नद्या, महासागर पर्वत असोत. जे जे दिसतं आहे, ते नाशिवंत आहे, हे ओळखून एका भगवंताचं शाश्वत टिकणारं नामच तेवढं, खरं खात्री धरण्यासारखं आहे. मृत्यूची सतत टांगती तलवार ओळखून सावध होऊन नामाला लागलो तर, शाश्वत आनंदाचा अनुभव याच जन्मात घेता येईल आणि स्वत:चा उद्धारही करता येईल.

..३०..

मनुवा सोचसमझकर देखले रे
नश्वर सब संसार ।।धृ।।

राजा जावे रानी जावे
जावे सब परिवार ।।
महल खजाना सब चल जावे
जावे घर दरबार ।।१।।

सूरज चाँद सितारे पर्वत
सागर नीर अपार ।।
दिन दिन काल सबी को खावे
धावे पवन सवार ।।२।।

बालपना जोबन सब बीता
बीता कामबिहार ।।
मौत खडी सिर उपर तेरे
अब तो चेत गँवार ।।३।।

प्रभुका नाम सुमर निशिबासर
छोड जगत व्यवहार ।।
'ब्रह्मानंद' मिटे भवबंधन
छूटे सकल बिकार ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

बिहार – क्रीडा, जोबन – यौवन

(ट्रॅक नं. ०३१)

अठराव्या शतकातले जेष्ठ गुरुभक्त स्वामी निरंजन रघुनाथ, यांचं हे पद म्हणजे, गुरुभक्तानं कोणत्या वृत्तीनं राहावं, त्याची रूपरेषाच आहे. स्वामींना खात्री आहे की गुरुवचनाप्रमाणं जो जगेल तो 'नराचा नारायण' होईल. शास्त्रांनी सांगितलेल्या गुरुभक्तीनं मुक्ती साधण्याचा मार्ग स्वामींनी स्वत: आचरलेला आहे. तो ते या पदातून सांगत आहेत.

ते म्हणतात की, गुरूंना सर्वस्वी अर्पण राहून, त्यांच्या वचनानुसार आयुष्य घडवलं तर, साक्षात निरंजनपद प्राप्त होईल. फक्त त्यासाठी आपल्या गुरूंवर, त्यांच्या शब्दांवर, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर, त्यांच्या आपल्यावरच्या हितबुद्धीवर – आपला पूर्ण विश्वास बसला पाहिजे. स्वत: स्वामींनी आपले गुरू रघुनाथ स्वामी यांच्या बाबतीत अशा विश्वासानं आणि निश्चयानं जगून दाखवलेलं असल्यानं, स्वामींचा या पदातला अनुभवसिद्ध बोध, साधकांनी लक्षात घ्यावा, असाच आहे.

..३१..

निश्चय पूर्ण करा , पूर्ण करा ।
गुरुवचने भव सारा ।।धृ।।

श्रुतिशास्त्राची उक्ति ।
होती गुरुवचनाने मुक्ति ।।१।।

गुरुचरणी मन जडले ।
त्याला सर्वही साधन घडले ।।२।।

गुरुवचनी जो राहतो ।
तो नर नारायण होतो ।।३।।

गुरुपदी निश्चय होता ।
येते निरंजनपद हाता ।।४।।

– श्री निरंजन रघुनाथ

(ट्रॅक नं. ०३२)

भगवंताचं प्रेम एकदा लागलं की, त्याचं नातं कसंकसं आणि कितीकिती प्रकारांनी दृढ होत जातं, हे अनुभवण्यासारखंच आहे. आधी एक दुष्प्राप्य आदर्श वाटणारा भगवंत, हळूहळू आपला सोयरा होत जातो, सांगाती होत जातो, तोच आपला त्राता, मित्रासारखा जिवलग होतो, जवळचा होतो, अगदी अंतरंगातलं स्थान त्याला प्राप्त होतं.

भगवंताचं होताहोता, त्याचंच दास्यत्व करावं, त्याच्याच चालीनं चालावं, असं सारखं वाटत जातं. सतत भगवंताचा, तो कसा आहे, कसा मिळतो, कसा वागतो – असा अनेक अंगांनी सारखा भगवंताचाच अभ्यास करीत राहावा, असं वाटतं. हा सारा अनुभव श्री तुकोबा या अभंगात मांडीत आहेत. हीच सारी अवस्था आपल्याआपल्या सद्‌गुरुंच्याबद्दलही व्हावी आणि आपण देवमय, गुरुमय कसं व्हावं, हे यातून जरूर घेता येईल.

..३२..

तू आम्हा सोयरा सज्जन सांगाती ।
तुजलागी प्रीती चालो सदा ।।१।।

तू माझा जिव्हाळा जीवीचा जिवलग ।
होसी अंतरंग अंतरीचा ।।२।।

गणगोत मित्र तू माझे जीवन ।
अनन्य शरण तुझ्या पायी ।।३।।

तुका म्हणे सर्वगुणे तुझा दास ।
आवडे अभ्यास सदा तुझा ।।४।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०३३)

भक्तीमध्ये भगवंताजवळ मन रमण्यात जर मोठा अडथळा कुठला असेल तर, दृश्याची आवड असलेल्या इंद्रियांचा. आपापल्या विषयाची अन् जगाची ओढ असलेली ही इंद्रियं सतत बाहेर झेपावतात आणि त्यामुळं हृदयातल्या सूक्ष्म भगवंताकडं त्यांना वळवणं, मोठं कठीण जातं. योगी पुरुष सामर्थ्यानं या इंद्रियांना खेचून आत आणू शकतात पण सामान्य भक्तानं काय करावं, त्याचं एक उत्तर श्री गोंदवलेकर महाराजांच्या या अभंगात गवसेल.

डोळे, हात, पाय – बाहेर जाणार, फिरणार. ते जर आवरता येणार नसतील तर, ते जिथं जातात ते ठिकाण तरी बदलून भक्तीला अनुकूल करून घ्यावं किंवा जिथं जातील तिथंच भगवंत ठेवावा. या युक्तीनंसुद्धा इंद्रियांशी संघर्ष न करता, त्यांच्यापासून होणारी हानी टाळता येईल आणि उलट भगवंताचं अनुसंधान वाढायला मदतच होईल. डोळ्यांनी रामाचं रूप पहाणं, कानांनी त्याचं नाम ऐकणं, हातांनी त्याचीच पूजा करणं, पायांनी यात्रा करून रामाचं आणि संतांचं दर्शन घेणं – अशा मार्गांनी आपल्यालाही युक्तीनं हा अडथळा दूर करता येईल आणि भगवंताची सेवा वाढवता येईल.

..३३..

तुझे रूप सदोदित ।
भरो माझे हृदयात ।।१।।
डोळियांचे हेचि सुख ।
पाहे राघवाचे मुख ।।२।।
श्रवणाचे ते काम ।
ऐके सदा रामनाम ।।३।।
हाती होवो देवपूजा ।
नमन करू रघुराजा ।।४।।
पायी होवो तीर्थाटन ।
वंदू संतांचे चरण ।।५।।
दीनदासाची ही सेवा ।
घेई घेई रे राघवा ।।६।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०३४)

साधकाच्या आयुष्यात सद्गुरूंचं स्थान किती व्यापक असतं, हे कळणंसुद्धा खरोखर किती कठीण आहे. हे गुरूंचं स्थान, देह धारण केल्यावर साक्षात श्रीरामप्रभू आणि वसिष्ठ ऋषींपासून ते आजवर मोठं विलक्षण आहे, हे खरं. गुरूंच्या या कृपेचं आणि शिष्याच्या आयुष्यात त्यांनी बजावलेल्या कामगिरीचं अनेकांना अनेक पातळ्यांवर, अनेक रूपांत दर्शन होत असतं, स्मरण होत असतं. कुणाला प्रापंचिक संकटात त्यांनी केलेल्या रक्षणाची अपूर्वाई वाटते, तर कुणाला त्यांनी केलेल्या उपदेशाचं महत्त्व वाटतं. पण या पदात माहुलीचे थोर सत्पुरुष श्री कृष्णदास महाराज यांनी केलेल्या गुरूच्या कार्याचं स्मरण, हे अनेक अर्थानं सखोल आणि वेगळं आहे. माणसाचं पापाचरण असो किंवा भ्रमामुळं जगात रमणं असो, सारं घडतं ते अज्ञानामुळं.

म्हणून श्री कृष्णदास महाराज धृपदातच म्हणतात की, गुरूंनी माझ्या अज्ञानाचा नाश केला आणि माझं सारं पूर्वापाप धुवून टाकलं. गुरूंनी परमशांतीचा अनुभव दिला आणि तोही नकळत दिला. आत्मस्वरूपाची ओळख दिली, त्यांच्याशी तादात्म्य झाल्यानं मी जीवनात निश्चिंत झालो. हे गुरुकृपेचे खरे अनुभव साधकांना मननीय वाटतील.

..३४..

अज्ञानाचा । नाश केला तू दुरिताचा ।।धृ।।

मी कोण मज हे कळले ।
गुरुकृपाघन मजवरि वळले ।
शान्तिसुखाते मजला दिधले ।
मज नकळत साचा ।।१।।

नाम ऐकूनी रूप पाहिले ।
ध्यान पाहुनी ज्ञान लाभले ।
कृपाप्रसादे एकरूप केले ।
लाभ निजरूपाचा ।।२।।

अनन्य होता चिंता पळाली ।
सर्वाठायी गुरुराज माऊली ।
भक्तावरि करी कृपा साउली ।
ध्यास पदरजाचा ।।३।।

वरिले मी गुरुचरणाला ।
जयाने माझा भवताप राहिला ।
रघुनाथहि ज्या वंदि पदाला ।
धन्य प्रताप गुरुचा ।।४।।

– श्री कृष्णदास महाराज

(ट्रॅक नं. ०३५)

आपण भगवंताकडं अनेक गोष्टी मागतो आणि श्री ब्रह्मानंदांसारखे सत्पुरुषही भगवंताकडं मागतात. पण त्यांत किती फरक आहे ! त्यांनी लौकिकातलं काही मागितलेलं नाही. त्यांनी हरिभक्तांची सेवा करायची संधी मला मिळू दे, असा वर मागितला आहे. त्या हरिभक्ताचं वर्णन ते इथल्या कन्नड पदात करतात. ज्यांच्या जिभेवर अखंड रामनाम आहे, भगवंताच्या प्रेमामुळं ज्यांचा कंठ सद्‌गदित होतो, देहभान हरपतं आणि ज्यांना सर्व प्राणिमात्रात राम दिसतो, अशा या हरिभक्तांची ताईतंदेबळगऊ म्हणजे आईवडील कुटुंबीय, सारे सारे धन्य होत. अशा हरिभक्तांची सेवा करण्यात ब्रह्मानंदांना धन्यता वाटते. यात आपण साधक म्हणूनही काही घेण्यासारखं आहे.

..३५..

धन्य इवर ताई धन्य इवर तंदे ।
धन्य इवर मंदि बळगउ ।।१।।

रामरामद् वस्ती यारनालिगयल्लि ।
यार हृदयदल्लि रामरूप ।।२।।

भक्तिप्रेमदिंद कंठसद्गदवाणी ।
बाष्पउदक होगी कण्णु तुंबा ।।३।।

नृत्य माडुवाग देहभानविल्ला ।
नोडुव जगवेल्ला रामराया ।।४।।

इन्थवर सेवा कोडो रामराया ।
बेडुव वरवा ब्रह्मानंद ।।५।।

– श्री ब्रह्मानंद

(ट्रॅक नं. ०३६)

मराठी गद्य भावार्थ

धन्य त्यांवी आई, धन्य त्यांचा पिता व धन्य त्यांच्या कुटंबातील माणसे.१.ज्यांच्या जिभेवर रामनाम आहे व हृदयात रामरूप आहे.२. ज्यांचा कंठ भक्तिप्रमाने सद्गद होऊन डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहातात. ३.ज्यांना नाचताना देहभान नसते व सर्व जग पाहात असताना ते राममय दिसते.४. हे रामराया,अशांची सेवा मला दे असा ब्रह्मानंद वर मागत आहे.५.

माणसाला प्रपंच करून त्याची इतकी सवय होते की, तो त्याचा स्वभावच बनतो. मग परमार्थ करू गेला तरी, त्याच प्रापंचिक स्वभावानुसार तो परमार्थ करू पहातो. परमार्थ हा वास्तविक एकट्याचा विषय. पण प्रपंचाच्या स्वभावानुसार त्यातसुद्धा माणसाला चार माणसं, मोठ्मोठे उपक्रम, पूजाअर्चा, उपासनेचे प्रकार, व्रतं, तीर्थयात्रा, तपं, अनुष्ठानं, यज्ञयाग अशा नाना गोष्टी लागतात.

वास्तविक, खऱ्या परमार्थाला किंवा भगवंताला यातलं काय काय लागतं, असं म्हटलं तर, एखादं तरी लागतं की नाही शंकाच उरेल. कारण आपलं कर्तव्य निरासक्तपणे आपण त्याच्या स्मरणात करावं, यापरतं खऱ्या परमार्थाला काय लागतं ? भगवंताचं स्मरण जरी नुसतं आपल्या साऱ्या प्रपंच व्यवहारात आणलं, तरी तोच प्रपंच परमार्थ होतो, इतकी ही सोपी पुरातन विद्या आहे.

म्हणून खऱ्या साधकांना भगवंताचं नाम, त्याचं स्मरण हेच सारसर्वस्व वाटतं. तीच त्यांची पूजाअर्चा, तोच त्यांचा कुळाचार, तेच त्यांचं ज्ञान, श्रवण, मनन – सारं काही. श्री तुकोबा या पदामध्ये स्वत:ची ही शुद्ध अवस्था वर्णन करतात, ती ज्या साधकांना शुद्ध परमार्थ हवा आहे त्यांनी, अंतर्मुख होऊन अभ्यासण्यासारखी आहे आणि आचरण करण्यासारखीच आहे.

..३६..

हेचि माझे तप हेचि माझे दान ।
हेचि अनुष्ठान नाम तुझे ।।१।।

हेचि माझे तीर्थ हेचि माझे व्रत ।
सत्य हे सुकृत नाम तुझे ।।२।।

हाचि माझा धर्म हेचि माझे कर्म ।
हाचि नित्यनेम नाम तुझे ।।३।।

हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ ।
हेचि जपध्यान नाम तुझे ।।४।।

हेचि माझे ज्ञान श्रवण मनन ।
हेचि निजध्यासन नाम तुझे ।।५।।

हाचि कुळाचार हाचि कुळधर्म।
हाचि नित्यनेम नाम तुझे ।।६।।

हा माझा आचार हा माझा विचार ।
हा माझा निर्धार नाम तुझे ।।७।।

तुका म्हणे दुजे सांगायासी नाही ।
नामेवीण काही धनवित्त ।।८।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०३७)

ज्याला आत्मपरीक्षणानं, सातत्यानं स्वत:च्या गुण–दोषांची, विशेषत: दोषांची जाणीव होते, त्या खऱ्या साधकाच्या असं लक्षात येतं की, देवाच्या प्राप्तीसाठी हव्या असलेल्या कुठल्या गोष्टी आपल्याजवळ नसणं आणि देवाला नको असलेल्या अनेक गोष्टी जवळ असणं, अशी आपली दुहेरी अडचण आहे.किंबहुना 'मला तू जवळ ठेव' अशी भगवंताला प्रार्थना करतानासुद्धा आपण या कृपेला पात्र नाही, याचं उत्कट भान त्याला सदैव असतं. म्हणून अशा भक्ताची आर्त प्रार्थना भगवंताच्या दयाळू अंत:करणाला सहज हात घालते.

अशी खऱ्या भक्ताची एक अजरामर प्रार्थना तुकोबांच्या या पदामध्ये साकारलेली आहे. आपल्या उणिवांची जाणीव आणि दुसऱ्या बाजूनं पात्र नसलो तरी भगवंतानं जवळ करावं ही तीव्र ओढ, अशा पार्श्वभूमीवरची ही प्रार्थना, अनेक साधकांना जवळची वाटते. शेवटी भगवंताच्या कृपादृष्टीची केलेली मागणी आणि नामाचा असलेला आधार या गोष्टीसुद्धा अनेक साधकांना जवळच्या वाटतात.

..३७..

करुनी विनवणी पायी ठेवितो माथा ।
परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ।।१।।

अखंडित असावे ऐसे वाटते पायी ।
साहोनि संकोच ठाव थोडासा देई ।।२।।

असो नसो भाव आलो तुझिया ठाया ।
कृपादृष्टी पाहे मजकडे पंढरीराया ।।३।।

तुका म्हणे आम्ही तुझी वेडीवाकुडी ।
नामे भवपाश हाते अपुल्या तोडी ।।४।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०३८)

माणूस एरवी कितीही सामर्थ्यवान झाला आणि जगावर त्यानं कितीही विजय मिळवला तरी, विकारांपुढं त्याला अनेकदा हार पत्करावी लागते.त्यातल्या त्यात लोभमोहापुढं तर अनेकांचं काही चालत नाही. हा लोभ प्रपंचातही असतो. माणूस कशाच्याही लोभात अडकला तरी ते अंतिमत: भगवंताच्या आणि आनंदाच्या आड येतंच.

म्हणूनच या पदामध्ये राजस्थानमधले थोर सत्पुरुष श्री ब्रह्मानंद, साधकाला विनवणी करतात की, बाबा रे, माझं ऐक आणि सोड हा लोभ! तू ज्या माणसांचा लोभ धरला आहेस, त्यांचं खरं स्वरूप स्वार्थाचं आहे आणि ते तुझ्या लक्षात येत नाही. ज्या विषयांच्या लोभात तू नकळत जगतो आहेस, ते तुझं मोलाचं आयुष्य हिरावून तुला कंगाल करीत आहेत, हे तुझ्या लक्षात कसं येत नाही ? तुझं अत्यंत दुर्लभ पण वाया गेलेलं मानवी आयुष्य किंवा ते जीवन ज्या आनंदाच्या प्राप्तीसाठी तुला दिलं, तो ब्रह्मानंद हे गोळा करून ठेवलेले लाखो करोडो रुपये तुला कदापि देऊ शकणार नाहीत. तेव्हा या लोभाबद्दल सावध हो आणि वेळीच आयुष्याचं सार्थक साध. ब्रह्मानंदांचा हा सल्ला सर्वच साधकांना उपयोगी ठरणारा आहे.

..३८..

मान ले कहना हमारा
मन की लालच छोड दे ।।धृ।।

चार दिन की जिंदगी
आखिर यहाँ से जायगा ।
सब तरफ से दिल हटा
हरि के चरण में जोड दे ।।१।।

यह सभी स्वारथ भरे
जिनको पियारे जानता ।
भजन कर प्रभु का सदा
सबसे परीती तोड दे ।।२।।

बालकपना जोबन गया
बूढा हुवा मरने लगा ।
अब तो मूरख चेतकर
विषयों से मनको मोड दे ।।३।।

यह तेरा मानुष जनम
पलपल में बीता जा रहा ।
'ब्रह्मानंद' मिले नहीं फिर
जो तू लाख करोड दे ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

जोबन – यौवन, परीती – प्रेम, माया

(ट्रॅक नं. ०३९)

राजस्थानातले थोर संत श्री ब्रह्मानंद यांचं हे पद म्हणजे 'नामावरच्या' निष्ठेचा एक मनोज्ञ आविष्कार आहे. आपल्याला मिळालेला दुर्लभ नरदेह पशूंसारखा केवळ देहसुखासाठी वापरणं म्हणजे, एक प्रकारची मस्करीच आहे हे सांगून ते म्हणतात की, ही मस्करी भल्यात न पडणारी आहे. कारण त्यामुळं माणूस पुन्हा देहाच्या गुलामीत ढकलला जातो आहे. अशा वेळी आपल्याला मिळालेलं तारुण्य, ऐहिक संपदा सारं क्षणभंगुर आहे, हे ओळखून आपल्याला लाभलेला देह टिकून आहे तोवरच, उद्धाराचा काही मार्ग चालला पाहिजे. त्या मार्गातही इतर कुठल्या साधनांची आटाआटी करण्यापेक्षा अखंड नामघोष करणं, भगवद्भजन करणं हेच सार्थकाचं ठरेल. तशीच वेळ पडली तर, क्षणभर प्रपंचाची न संपणारी कामं बाजूला सारा, पण नामाला प्राधान्य द्या. असं श्री ब्रह्मानंद कळकळीनं का सांगतात, ते विचार करण्यासारखं आहे हे निश्चितच.

..३९..

नाम नाम नाम जपो नाम राम का
काम काम काम तजो काम धाम का ।।धृ।।

बिना हरि के नाम कबी न सुख पाएगा ।
मस्कर के अंतकाल में तू नरक जाएगा ।
मिलेगा बार बार तुझे तन गुलाम का ।।१।।

करता है क्या गुमान तू जोबन वा माल का ।
मेहमान है यह पास तेरे आजकाल का ।
पुतला बिखर जाएगा तेरा हाडचामका ।।२।।

तप योग यज्ञ दान कर्म है बडे सही ।
कलियुग में नाम के समान दूसरा नहीं ।
मिलता है यत्न से बिना, बिनाही दामका ।।३।।

पाकर मनुज का तन जो हरिनाम ना लिया ।
चिंतामणी को मूढ काच से बदल दिया ।
'ब्रह्मानंद' भजन के बिना जिना न काम का ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

मस्कर – चेष्टामस्करीचे बेजबाबदार जीवन,
तजो – त्यजो, बाजूला ठेवा

(ट्रॅक नं. ०४०)

आपलं बरंचसं आयुष्य हे खाण्यापिण्याच्या चिंतेत जातं, हा आपला अनुभव आहे. व्यवहार म्हणून स्वत:च्या पोटासाठी आपण धडपड करणं, हे रास्त असलं तरी, अखंड त्याच धडपडीत राहून आपण मनुष्य योनीत जन्माला कशासाठी आलो, त्याचा काहीही विचार न करता नुसतंच पोटासाठी धडपडत राहाणं, हे नक्कीच रास्त नव्हे. कारण, पोटासाठी धडपड करणारा माणूस, पोटासाठी किती धडपड करायची याचं भान न राहून, अखेर त्याच्यासाठीच, पुढं गरज नसतानाही धडपडत राहिलेला दिसतो.

या अभंगात श्री तुकोबांनी म्हटल्याप्रमाणं जगात जन्माला घालणाऱ्यालासुद्धा आपली काळजी आहे, हे विसरून स्वत:च जणू स्वत:चं नि जगाचं चालवल्याच्या भ्रमात, माणूस आयुष्य व्यर्थ घालवतो. म्हणून या पदातून आपल्याला सावध केलेलं आहे, भगवंताबद्दल दृढभाव धरून जगण्याचा मार्ग दाखवलेला आहे आणि ते लक्षात घेण्याजोगं आहे.

..४०..

नित्य उठोनिया खायाचीच चिंता ।
आपुल्या तू हिता नाठवीसी ।।१।।

जननीचे पोटी उपजलासी जेव्हा ।
चिंता तुझी तेव्हा केली तेणे ।।२।।

चातका लागुनि मेघ नित्य वर्षे ।
तो तुज उदास करील केवी ।।३।।

पक्षी वनचरे आहेत भूमीवरि ।
तयालागी हरी उपेक्षीना ।।४।।

तुका म्हणे भाव धरून राहे चित्ती ।
तरि तो श्रीपती उपेक्षीना ।।५।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०४१)

श्री नरहरी उर्फ तात्यामहाराज हे दत्तावतारी श्री माणिकप्रभूंचे बंधू. या आपल्या अलौकिक बंधूंच्याकडून ते परमार्थमार्ग शिकले, जगले. त्यांचा हा अभंग म्हणजे साधकांच्या सदैव चिंताग्रस्त राहणाऱ्या मनाला विश्रांती देऊ शकणारी संजीवनीच होय.

साधकपण कितीही जपावं म्हटलं तरी, माणसाच्या मनाला चिंता काही सोडीत नाही. मग या चिंता काही प्रापंचिक विषयांच्या असोत किंवा काही साधनेतल्या असोत. वास्तविक आपलं कर्तव्य पार पाडल्यावर किंवा काही बाबतीत आपलं काही कर्तव्य नसताना, उगीच काळजी करीत राहाणं, म्हणजे साधनेलाही हानीचं असतं आणि शारीरिक किंवा लौकिकदृष्ट्याही हानीचंच असतं. हे मनाला कळत असलं तरी मन स्थिर होत नाही. अशावेळी जर असा एखादा सत्पुरुषाचा शब्दस्पर्श झालेला बोध आपण मनात घोळवला तरी, तो मनाला स्थिर व निश्चिंत व्हायला मोठी मदत करू शकेल.

..४१..

प्रभु माझा काय करिल ते खरे ।।धृ।।

इतर चिंतल्या व्यर्थ ते काई ।
वाईट अथवा बरे ।।१।।

वाहुनि चिंता काही एक नोहे ।
ठेवि मनाला स्थिर रे ।।२।।

ठेवुनि भार प्रभूच्या चरणी ।
नरहरि धरितो धीर रे ।।३।।

– श्री नृसिंहतात्या महाराज

(ट्रॅक नं. ०४२)

श्री गोंदवलेकर महाराज यांचा हा अभंग म्हणजे आपल्या उपास्यदैवतावर आपली निष्ठा कशी आत्यंतिक असावी, त्याचा वस्तुपाठच आहे. श्रीराम हे त्यांचं नुसतंच प्रिय किंवा उपास्य दैवत नव्हतं तर, त्याच्यावर त्यांची सर्वार्थानं निष्ठा होती. त्या निष्ठेचे विविध टप्पे या अमूल्य अभंगात आपल्याला पहायला मिळतात.

रामापुढं त्यांना सारी लौकिक सुखं – उपभोग हे क:पदार्थ वाटतात. लौकिक सुखाची जास्तीत जास्त कल्पना म्हणजे स्वर्ग आणि त्याचा राजा इंद्र आणि त्याचे सुखोपभोग. पण सामान्य माणसाला अगदी हवीशी वाटणारी ही गोष्ट श्री महाराजांना एखाद्या सोंगाइतकी फोल आणि त्याज्य वाटते. तर रामाच्या प्राप्तीपुढे त्यांना ज्या ब्रह्मसुखासाठी साधनी, ज्ञानी माणसं धडपडतात, ते ब्रह्मसुखही त्यांना क्षुद्र वाटतं आणि रामनामावर तर त्यांचं इतकं प्रेम आहे की, भगवंताच्या प्राप्तीसाठी ब्रह्मज्ञानच काय, इतर सगळी साधनंसुद्धा त्यांना असार वाटतात. यावरून तरी, भगवंताच्या नामाचं मोल आपण ओळखावं, हे बरं.

..४२..

सर्व साधनांचे सार ।
सखा माझा रघुवीर ।।१।।

नको नको ब्रह्मज्ञान ।
रामनामी लावा मन ।।२।।

इंद्रपद इंद्रभोग ।
रामावाचून अवघे सोंग ।।३।।

दास म्हणे ब्रह्मसुख ।
रामावाचून काळे मुख ।।४।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०४३)

माणसाची सारी धडपड सुखासाठी आहे. त्यासाठी मात्र तो त्याची जी जी वासना होईल, जी जी कल्पना होईल, ती ती पुरी करून ते सुख मिळवायचा प्रयत्न करतो. पण त्याच्या हळूहळू हे लक्षात यायला लागतं की, असे सारे प्रयत्न करून जे सुख मिळतं ते क्षणिक, फसवं आणि नश्वर असतं. तेव्हा या साऱ्या वासनांची आणि कल्पनांची दिशा बदलते आणि सद्‌गुरूंनी दाखवलेल्या मार्गानं हीच दिशा भगवंताकडं लावली जाते.

मग मनी, ध्यानी, कल्पनेनं सर्वत्र भगवंत हा विषय राहतो. त्यामुळं, जे खरं सुख भगवंताच्या किंवा रामाच्या पायी असतं, त्या खऱ्या सुखाची कल्पना आपल्याला येते.

असा प्रत्यक्ष अनुभव घेऊन तो या पदात मांडणारे सत्पुरुष श्री आनंदसागर या पदात अखेरीला म्हणतात की, हा सुखाचा मार्ग दाखवणाऱ्या सद्‌गुरूंच्या चरणांना मी कधीही सोडणार नाही. ते वारंवार सांगतात की, मला आता रामप्राप्तीशिवाय दुसरी कुठली वासना उरली नसून, माझं सारं सुख आता रामाच्या पायाशी राहण्यात आहे.

..४३..

सर्व सुख माझे राघवाचे पायी ।
वासना ती नाही दुजी मज ।।१।।

दुजे मज नाही सगुण निर्गुण ।
नामी तनुमन ध्यान लागो ।।२।।

लागो ध्यानवृत्ति रामाचे चरणी ।
कल्पना जाऊनी हरि कल्पो ।।३।।

हरी कल्पिलिया हरि दाही दिशा ।
चार खाणी तैशा हरिरूप ।।४।।

हरिरूप मज वाटे चराचरी ।
ऐसी कृपा करी सद्‌गुरुनाथा ।।५।।

कृपा करी म्हणुनि धरियेले पाय ।
सोडोनि न जाय हरिबाळ ।।६।।

– श्री आनंदसागर महाराज

चार खाणी – चारही योनींतले जीव उदा. अंडज, स्वेदज, जारज, उद्भिज

(ट्रॅक नं. ०४४)

राजस्थानातले थोर सत्पुरुष श्री ब्रह्मानंद यांचं हे पद, एका बाजूला आपल्याला सत्संगाच्या अपूर्वतेची आणि गरजेची जाणीव करून देतं, खऱ्या साधकाला त्याची किती तळमळ लागायला हवी याची जाणीव करून देतं, तर दुसऱ्या बाजूला तीर्थयात्रेसारख्या इतर लौकिक साधनांत आपलं मूळ काम कसं साधत नाही, याकडेही आपलं लक्ष वेधतं. आपल्याला त्याबद्दल सावधही करतं.

ते म्हणतात, तीर्थयात्रा करून जर आपल्या मनात, वृत्तीत काहीच सुधारणा होत नसेल तर, त्या यात्रांचा काय उपयोग ? मोठ्या तपश्चर्येनं कदाचित इंद्रियांवरसुद्धा विजय मिळवता येईल पण, हृदयात जर पालट झाला नाही, त्यात जर सारासार विचार, भगवंताचा विचार स्थिरावला नाही तर त्या तपश्चर्येचा काय उपयोग ? आणि पूजाअर्चा, मंदिरं करूनसुद्धा जर सत्पुरुषांची थोरवी कळली नाही तर भगवंत कसा भेटणार ? म्हणून ते साधकांना अखेरीला सल्ला देतात की, गुरूला शरण जाऊन सतत सत्संगात राहण्याचा प्रयत्न करा म्हणजे, तुम्हाला भगवंताचं जे ज्ञान व्हायला हवं ते तर होईलच पण, तुम्ही भवसागरही तरून जाल. अनेक वृष्टींनी साधकांना हा अभंग मोलाचा आहे.

..४४..

सतसंगत जग सार साधो ।
सतसंगत जग सार रे ।।धृ।।

काशी न्हाये , मथुरा न्हाये ,
न्हाये हरिदुवार रे ।
चार धाम तीरथ फिर आये ,
मन का नहीं सुधार रे ।।१।।

बन में जाय कियो तप भारी ,
काया कष्ट अपार रे ।
इंद्रियजीत करी वश अपने ,
हिरदे नहीं विचार रे ।।२।।

मंदिर जाय करे नित पूजा ,
राखे बडो अचार रे ।
साधूजन की कदर न जाने ,
मिले न सिर्जनहार रे ।।३।।

बिना सतसंग ज्ञान नहीं उपजे ,
कर ले जतन हजार रे ।
'ब्रह्मानंद' खोज गुरु पूरा ,
उतरो भवजल पार रे ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

हिरदे – हृदयात, सिर्जनहार – परमेश्वर, जतन – यत्न

(ट्रॅक नं. ०४५)

परमार्थाचा मार्ग जरी बरोबर असला, पटला तरी, तो एकट्यानं चालणं हे फार कठीण काम आहे. त्याला जर सत्संगाची जोड मिळाली तर, हाच दुष्कर प्रवास सोपा होतो, हलका होतो. कारण वाटेत अनेकदा धीर सुटतो, संयम सुटतो, संशय येतो, दिशाभूल होते, बेसावधपणा येतो, वेगवेगळ्या दुःखांनी पिंजून जायला होतं. अशा अनेक प्रसंगांत माणसाची भक्तीची वाटचाल खुंटते, अनेकदा थांबते, मनात विकल्प येतात.

यासाठी समविचारी साधकांचा सहवास असेल तर, त्यांची या प्रसंगात तरून जायला आणि मूळ अनुसंधान टिकवायला मदत होते. हा भाव श्री नामदेव महाराजांनी या पदात फार सुरेखपणे व्यक्त केला आहे. साधक म्हणून हा अभंग आपल्याला फारच मोलाचा आहे.

..४५..

दुर्लभ नरदेह जाला तुम्हा आम्हा ।
येथे साधू प्रेमा राघोबाचा ।।१।।

अवघे हातोहाती तरो भवसिंधु ।
आवडी गोविंदु गाऊ गीती ।।२।।

हिताचिया गोष्टी सांगू एकमेका ।
शोक मोह दुःखा निरसू तेणे ।।३।।

एकमेका करू सदा सावधान ।
नामी अनुसंधान तुटो नेदू ।।४।।

घेऊ सर्वभावे रामनाम दीक्षा ।
विश्वासे सकळिका हेचि सांगो ।।५।।

नामा म्हणे शरण रिघो पंढरीनाथा ।
नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ।।६।।

– श्री नामदेव महाराज

(ट्रॅक नं. ०४६)

माणिकनगरचे थोर साक्षात्कारी दत्तावतार श्री माणिकप्रभू यांच्या अनेक प्रेमळ पदांपैकी हे पद आहे. मनाचं महत्त्व तर व्यवहारात काय, परमार्थात काय निर्विवादच आहे. भक्तीचा मार्ग हा, याच मनाला सक्तीनं भगवंताकडं लावण्याऐवजी, युक्तीनं आणि त्याच्या कलानं घेऊन, भगवंताकडं लावण्याचा आहे.

या पदामध्येसुद्धा श्री माणिकप्रभू, मनाला विश्वासात घेऊन कसं नामसंकीर्तनाकडं वळवतात, ते अगदी पाहाण्यासारखं आहे. ते म्हणतात, आपल्या आयुष्याचा एकेक दिवस वाया जातो आहे, असा दुर्लभ देह परत मिळणार नाही, तेव्हा याचा विचार कर आणि हे मना, तू एकाग्र होऊन भगवंताचं गुणगान कर, तुझ्या इतर व्यापामुळं मनात अविरत कल्पना येतील पण, त्या साऱ्या कटाक्षानं सोडून देऊन, तत्पर होऊन, हे संकीर्तन केलंस तर, तुझ्या यमयातना म्हणजेच आत सोसावं लागणारं दु:ख, बेसावधपणामुळं येणारा पुनर्जन्म, हे सारं टळेल. आपणही आपल्या मनाला करावी अशीच ही प्रार्थना आहे.

..४६..

गाई गाई मना रे ।
हरिचे गुण गायी ।।धृ।।

एक्या भावे तत्पर होउनी ।
त्यजुनी सकळ कल्पना रे ।।१।।

जातसे दिन दिन व्यर्थचि वाया ।
न ये नरदेह पुन्हा रे ।।२।।

माणिक म्हणे मना नामप्रतापे ।
चुकती यमयातना रे ।।३।।

– श्री माणिक प्रभू

(ट्रॅक नं. ०४७)

भगवंताच्या भक्तीविषयीसुद्धा आपल्या मनात किती चित्रविचित्र कल्पना असतात. कुणी भस्म लावील, कुणी तीर्थयात्रा करील, कुणी वेदशास्त्रपुराणं यात रमेल, कुणी वादविवाद करेल. पण या अभंगामध्ये राजस्थानातले थोर सत्पुरुष ब्रह्मानंद, या साऱ्याबद्दल आपल्याला सावध राहायला सुचवतात. ते म्हणतात, चारधाम यात्रा करून जर मन शुद्ध झालं नाही तर, त्या यात्रेचा काय उपयोग ? वेदपुराणांनी, शास्त्रार्थानं आणि खंडनमंडनानं जर नुसताच लौकिक वाढवला तर, भगवंतप्राप्तीला त्याचा काय उपयोग ? म्हणून त्यांचा सल्ला आहे की, आयुष्य फार थोडं आहे, तेव्हा असं कुठंतरी भरकटण्यापेक्षा, भगवंताचं भजन करून, आपण खरा आनंद मिळवू या.

..४७..

हरि के भजन बिना सुख नाही ,
नर क्यों बिरथा भटकाई रे ।।धृ।।

काशी गया , द्वारका जावे ,
चार धाम तीरथ फिर आवे ,
मन की मैल न जाई रे ।।१।।

छाप तिलक बहु भांति लगाये ,
सिरपर जटा विभूति रमाये ,
हिरदय शांति न आई रे ।।२।।

वेद पुराण पढे बहु भारी ,
खंडन मंडन उमर गुजारी ,
बिरथा लोक बडाई रे ।।३।।

चार दिवस जग बीच निवासा ,
ब्रह्मानंद छोड सब आशा ,
प्रभु चरणन चित लाई रे ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

(ट्रॅक नं. ०४८)

विदर्भातल्या डव्हा या क्षेत्राला आपल्या भक्तिकार्यानं पंढरीचं माहात्म्य आणणाऱ्या पूज्य श्री विश्वनाथ महाराजांची ही रचना म्हणजे, साधकानं कसं जगावं, याचा एक छोटासा आलेखच आहे. ज्याला शुद्ध, खऱ्या भक्तीची आवड असेल, त्यानं भक्तीचं आचरण कसं करावं, हे अगदी मोजक्या पण प्रभावी शब्दांत या अभंगामध्ये आलेलं आहे.

एका बाजूनं, आपलं अंत:करण सतत शुद्ध करीत असावं, दुसऱ्या बाजूला खऱ्या अर्थानं सत्कर्मांचं नित्य आचरण करीत राहावं आणि तिसऱ्या बाजूला भगवंतावरचा अत्यंत अविचल, दृढ असा भक्तिभाव जोपासावा. अशी परमार्थाची इतकी साधी त्रिसूत्री श्री विश्वनाथ महाराज या पदात देतात. त्यातही वैशिष्ट्य हे की, हे सारं स्वत: आचरल्यानं आपण धन्य झाल्याची दुर्मीळ खात्रीसुद्धा ते अखेरीला देतात. हे सारं मनावर ठसलं तर साधकाचा आत्मविश्वास खचितच वाढेल आणि योग्य साधन घडेल.

..४८..

ज्याचे शुद्ध अंत:करण ।
नित्य होई तीर्थस्नान ।।१।।
सत्कर्म नित्य जो करी ।
तीच त्याची व्रत वारी ।।२।।
वृढ भाव देवावरी ।
देवच येई त्याचे घरी ।।३।।
विश्वनाथ ऐसा धन्य ।
उद्धरिला सुखी पूर्ण ।।४।।

– श्री विश्वनाथ महाराज

(ट्रॅक नं. ०४९)

एकोणिसाव्या शतकातले परांड्याचे थोर वेदान्ती सत्पुरुष श्री हंसराज स्वामी, यांच्या या पदामध्ये, गुरुभेटीची आणि गुरुकृपेची तळमळ सत्पुरुषांमध्ये किती पराकोटीची असते, याचं मोठं मनोज्ञ दर्शन होतं. श्री हंसराज स्वामी आपल्या गुरूंनाच परम दैवत मानीत आणि गुरूंची आपल्यावर कृपा होणं, हीच आयुष्यातली सर्वांत मोलाची गोष्ट आहे, असं मानीत. या तळमळीच्या पदात ते सुरुवातीलाच म्हणतात, मला संसाराचं फोलपण 'मी माझं' याचं फोलपण पूर्ण लक्षात आलं आहे. त्याचा मला तिटकाराही वाटतो.आपलं जिणं म्हणजे उगीचच भूमिभार आहे हेही कळतं. पण ते म्हणतात, हे नुसतं वाटून काय उपयोग? त्यानं मला गुरुभेट कशी होणार? पुढं ते साऱ्या देवदेवतांना प्रार्थना करतात की, आपण तरी कुणी कृपा करा आणि माझी सद्‌गुरुंची भेट घडवा.

त्यांची ही गुरूंबद्दलची, त्यांच्या भेटीबद्दलची, त्यांच्या मार्गाबद्दलची ओढ साधकांना खूप काही सांगून जाते. त्याचबरोबर सद्‌गुरुभेट हाच जणू मोक्ष, असा शेवटच्या कडव्यात ध्वनित होणारा भाव स्वामींनी गुरूंना आपल्या आयुष्यात किती मोठं महत्त्व दिलेलं होतं, ते दाखवतो आणि साधकांना मार्गदर्शकही ठरतो.

..४९..

केव्हा कृपा करिल गुरुमाय ।
कोणी तरी सांगा हो ।।धृ।।
मजला न लगे हा संसार ।
मी मी माझे हा जोजार ।
व्यर्थचि होणे धराभार ।
ऐसे वाटुन काय ।।१।।
अगा विष्णु सदाशिवा ।
अगा गजानना ब्रह्मदेवा ।
रामकृष्ण देवदेवा ।
दावा कोणी सद्‌गुरुपाय ।।२।।
वेद गातसे जयास ।
तयाविण अवघे फोल ।
कधि तुटेल हा भवपाश ।
मोक्ष मज होइल काय ।।३।।

– श्री हंसराज स्वामी

वेद – श्री हंसराज स्वामींची नाममुद्रा

(ट्रॅक नं. ०५०)

कर्मांच्या सततच्या सवयीमुळं, माणसाची कर्मावर एवढी भिस्त आहे की, प्रपंचात काय, परमार्थात काय, भगवंतावर सोपवून राहता येणं, त्याला फारच अवघड जातं, जरी त्याचा भगवंतावर कितीही विश्वास असला तरी ! प्रपंचाचं एकवेळ ठीक आहे, पण परमार्थात जो मनुष्य भगवंतच मिळवायला निघाला आहे, त्याला तरी, भगवंतावर श्रद्धा ठेवून, त्याच्यावर सोपवून राहायचं जमायला काय हरकत आहे ? पण सारं असं भगवंतावर सोपवून केवळ त्याच्या स्मरणात , नामात रहाणं फार कठीण पडतं हे खरं. कारण कर्माच्या सवयीनं स्मरणाबरोबर यात्रा, तीर्थ, व्रतं करावी, असं सारखं वाटत राहतं.

पण या पदात संत मीराबाई म्हणतात, हे कृष्णा, मी केवळ भजनाच्या भरवशावर निश्चिंत राहिले आहे! मी कुठल्या तीर्थयात्रा केल्या नाहीत, व्रतवैकल्यं केली नाहीत, मंत्रतंत्र शिकले नाही, वेदपुराणं शिकले नाही, मी केवळ मनानं तुझ्या चरणांची दासी बनून तुझं गुणगान करीत रानावनातून हिंडते आहे. या म्हणण्यातली साधनेतली सरलता, श्रद्धा आणि एकनिष्ठा आपल्याला खचितच शिकण्यासारखी आहे.

..५०..

मैं तो तेरे भजन भरोसे अबिनासी ।।धृ।।

तीरथ बरतते कछु नहीं कीनो ।
बन फिरे है उदासी ।।१।।

जंतर मंतर कछु नहीं जानूं ।
वेद पढो नहीं कासी ।।२।।

मीरा के प्रभु गिरिधर नागर ।
भई चरण की दासी ।।३।।

– श्री मीराबाई

तीरथ बरतते – तीर्थव्रते, भई – झाली

(ट्रॅक नं. ०५१)

संतांनी मनाचं परमार्थातलं महत्त्वाचं स्थान ओळखून, त्याचा वेळोवेळी विचार केला आहे. थोर सत्पुरुष स्वामी ब्रह्मानंद यांचं हे पद, माणसाला मनाच्या या करामतींची पूर्ण कल्पना आणून देणारं आहे. ते म्हणतात, एका जागी एक पळभरसुद्धा न टिकणाऱ्या या मनाच्या रात्रंदिवस चाललेल्या हालचालींना मर्कटलीला म्हणणंच योग्य ठरेल. देह, पैसा, स्त्रिया, मुलंबाळं कशाच्या तरी लोभात सारखं गुरफटून ते धुंदीत वावरत असतं आणि आपल्यालाही वावरायला लावतं. या त्याच्या करामतींमुळं आपण बेसावध राहतो आणि पुन्हा पुन्हा जन्ममरणाच्या चक्रात फिरत बसतो, हे आपल्या कधी लक्षात येईल का ?

शेवटी ते साधकाला म्हणतात, या मनाला भगवंताकडं वळवलंस तर मात्र या भवबेडीतून आपली निश्चित सुटका होईल. त्यासाठी मनाचं ऐकू नका, हा त्यांनी धृपदात दिलेला इशारा, कायम मनात बाळगणं साधकाला गरजेचं आहे.

..५१..

मन की बात न मानो साधो ।।धृ।।

मन चंचल मर्कटसम निशिदिन
रहे न एक ठिकानो रे ।
चिंतन करत सदा विषयन को
माया भरम भुलानो रे ।।१।।

तन धन सुत दारा के माही
रात दिवस लपटानो रे ।
मोहमयी मदिरा को पीकर
फिरत सदा मस्तानो रे ।।२।।

लाभ हानि नहीं समझे मूरख
करे जो मन को मानो रे ।
सो जन कब हूँ मोक्ष नहीं पावे
जनममरण भटकानो रे ।।३।।

रोक जतन से मन विषयन से
हरि चरणन में आनो रे ।
ब्रह्मानंद कटे भवबंधन
यह निश्चय कर जानो रे ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

(ट्रॅक नं. ०५२)

श्री गोंदवलेकर महाराज यांचा हा भावपूर्ण अभंग म्हणजे भगवंताला, सद्‌गुरूंना उद्देशून केलेली एक आर्त प्रार्थनाच आहे. अनेकदा आपणही असं घडताना पाहातो की, आपल्याला महत्त्वाचं काय ते कळतं उदाहरणार्थ नाम घ्यावं, भगवंताचं स्मरण अखंड रहावं, हे कळतं पण हे आकलन अनेकदा बौद्धिक असतं, त्यामुळं मन ते स्वीकारीत नाही. त्यानुसार ते वागत नाही. खूप प्रयत्न करूनसुद्धा हे घडत नाही, तेव्हा साधक काकुळतीला येतो आणि मनाला वळवण्याची आणि चित्तात हे साधनेचे संस्कार खोल रुजवण्याची प्रार्थना साधक भगवंताला करतो.

श्री महाराजांनी इथं केलेली तळमळीची प्रार्थना त्यामुळंच खऱ्या साधकाला जवळची वाटेल. श्री महाराजांनी मात्र या अभंगात मांडलेले प्रयत्न इतके निकराचे आहेत की, आता हे घडलं नाही तर माझे प्राण जातील, असं ते म्हणतात. अभंगात सुरुवातीपासून शेवटपर्यंत ते आग्रह मात्र फक्त नाम आणि स्मरणाचाच धरतात. इतकं नामाचं महत्त्व, इतकं प्रेम आपल्याला लागावं, असं वाटतं.

..५२..

माझे चित्त सदा करा पायी स्थिर ।
अखंड रघुवीरस्मरण राहो ।।१।।

नामस्मरण हेचि चित्ताचे जीवन ।
एवढी मज खूण सांगा स्वामी ।।२।।

तुम्हावीण कोणा शरण आता जाऊ ।
माझे मायबापा दीनानाथा ।।३।।

दीनदास म्हणे आता प्राण माझा जाय ।
करी माझी सोय रामनामी ।।४।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०५३)

श्री मारुतीराय हे दास्यभक्तीचे मोठे आदर्श आहेत. त्यामुळं कोणत्याही भक्ताला श्री मारुती हा तर आदर्श आहेच पण, त्या श्री मारुतीचं नुसतं स्मरणसुद्धा भक्ताला पुण्यकारक आहे, असं इथं श्री समर्थ म्हणतात.

या पदात श्री समर्थ म्हणतात की, श्री मारुतीच्या स्मरणात पुढं पाऊल टाकणं म्हणजे अत्यंत शुभशकुनावर कार्यारंभ करण्यासारखं आहे. श्री मारुतीची उपासना करून तो प्रसन्न करून घेता येतोच पण त्याचं एक वैशिष्ट्य आहे की, श्री मारुतीचं त्याच्या उपास्यदैवत असलेल्या श्रीरामावर एवढं प्रेम आहे की, त्या श्री रामाची उपासना करणाऱ्यावरही तो प्रसन्न होतो. अशा श्री रामाच्या उपासकांचंही श्री मारुती सदैव रक्षण करतो. म्हणून अशा शक्ति, बुद्धीचा आणि दास्यभक्तीचा आदर्श असलेल्या श्री मारुतीरायाची उपासना आपण अवश्य करावी आणि आपल्या उपास्यदैवतावर आणि त्याची उपासना करणाऱ्यावरसुद्धा, प्रेम कसं करावं, हेही शिकावं.

..५३..

नाव मारुतीचे घ्यावे ।
पुढे पाऊल टाकावे ।।१।।

अवघा मुहूर्त शकून ।
हृदयी मारुतीचे ध्यान ।।२।।

जिकडे तिकडे जाती भक्त ।
पाठी जाय हनुमंत ।।३।।

रामउपासना करी ।
मारुती नांदे त्यांचे घरी ।।४।।

दास म्हणे ऐसे करा ।
सदा मारुती हृदयी धरा ।।५।।

– श्री समर्थ रामदास स्वामी

(ट्रॅक नं. ०५४)

माणूस कर्म करतो ती काही उद्देश किंवा हेतू धरून करतो. कर्म पार पाडण्यासाठी अथक प्रयत्न करून हे उद्देश तो साध्यही करतो. पण नुसतेच खूप कष्ट झाले आणि मूळ हेतू जर साध्य झाला नाही तर, माणूस ते सारं फुकटं गेलं असं मानतो, हळहळतो. अशीच हळहळ सत्पुरुषांना सामान्य माणसाकडं बघून वाटते.

मनुष्याच्या दुर्लभ जन्माला येऊन जन्म फुकट घालवणाऱ्या माणसाची फजिती या अभंगामध्ये श्री गोंदवलेकर महाराज यांनी मोठ्या कळकळीनं मांडली आहे. जिवाला माणसाच्या जन्माला घालताना, भगवंताचाही हेतू असतो की, ही सर्वोच्च निर्मिती आहे. हा मला ओळखील, जाणील, सर्वदृष्ट्या बंधनमुक्त होईल, पूर्णत्व गाठील. त्यासाठी शारीरिक ताकत, बुद्धी, भावना – सर्व शक्ती देऊन त्याला पाठवलेलाही असतो. माणूससुद्धा जन्माला आल्यापासून अगदी अविरत कर्म करून, कर्मांचा हिमालय उभा करतो. पण मूळ हेतू सोडून सारं काही साध्य करतो. शेवटी मात्र जसा दुबळा आणि परस्वाधीन जन्माला येतो, तसाच मी माझं करीत अधिकच दुबळा , परस्वाधीन आणि मनानं विकल होऊन मरून जातो, यापेक्षा मानवी जीवनाची शोकांतिका कुठली ? ही आपली फजिती निदान आता तरी लक्षात घेऊन, कुठल्या भ्रमात, अयोग्य अनावश्यक व्यापात न अडकता, आपलं उर्वरित आयुष्य सार्थकाचं कसं होईल, हे पाहाण्याचा निर्धार आपण करू या.

..५४..

प्राणि जन्मासि हो आला ।
आला तैसाचि हो गेला ।।धृ।।
माझे घर माझे धन ।
व्याकुळ झाला पंचप्राण ।।१।।
माझी माता माझी कांता ।
कोण आहे सांगा आता ।।२।।
स्त्रियापुत्रांचा हो लळा ।
कार्याकारण पडती गळा ।।३।।
इष्टमित्र अवघे जन ।
वाट पाहाती दुरून ।।४।।
आप्तसोयऱ्यांची गति ।
अवघे सुखाचे सांगाती ।।५।।
दास म्हणे सांगू किती ।
जन्मा आल्याची फजिती ।।६।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०५५)

माणसाला अनेकदा सत्संगाचं महत्त्व कळतं, त्यासाठी वेळ द्यायला हवा हे पटतं, पण त्याचा अंमल करताना अनेक अडचणी येतात. त्या अडचणींतली सर्वांत मोठी अडचण श्री नामदेव महाराज या अभंगात स्पष्टपणे मांडीत आहेत.

माणूस पोटासाठी जेवढी वणवण करतो, तेवढी तो इतर कुठल्याही गोष्टीसाठी क्वचितच करीत असेल. वस्तुत: पोटाला खाल्याशिवाय तो जगू शकणार नाही. मग तेच जर भागलं नाही तर कुठला सत्संग नि कुठलं काय ! इथंपर्यंत ठीक आहे. पण प्रामाणिकपणे विचार केला तर मूळ भुकेची गरज भागल्यावर, तडक सत्संगाला हजर होणारे किती असतील, हा विचार केला तर लक्षात येतं की, हे पोट अन् ही भूक हे वेगळंच आहे. हे आहे माणसाचं हवेपणाचं पोट ! त्यात काहीही टाका ते भरायला तयार नाही. उलट, खाऊनखाऊन आणखीनच भुकावणारं हे पोट, माणसाला सततची चिंता आणि दैन्यच देतं. सत्संगाच्या आणि भगवंताच्या ते आड येतं. याची खंत वाटून माणसानं हे हवेपण आवरायचं ठरवलं तर, माणसाचं कल्याण दूर नाही.

..५५..

वीतभर पोट लागलेसे पाठी ।
साधुसंगे गोष्टी सांगू न देई ।।१।।

पोट माझी माता पोट माझा पिता ।
पोटाने ही चिंता लाविलीसे ।।२।।

पोट माझा बंधु पोट माझी बहीण ।
पोटाने हे दैन्य मांडिलेसे ।।३।।

विष्णुदास नामा पोटाकडे पाहे ।
अझुन किती ठाये हिंडवीसी ।।४।।

– श्री नामदेव महाराज

(ट्रॅक नं. ०५६)

कोणत्याही माणसाला प्रपंच, व्यवहार, कर्मं काही सुटलेली नाहीत अन् ती सोडायची तशी गरजही नाही. पण अडचण अशी येते की, हे सारं सतत करीत राहिल्यानं आपण अडकतही जातो आणि त्या कर्मांची निवड चुकली असेल तर, विनाशाकडंही जाऊ शकतो. त्यासाठीच सद्‌गुरु आपल्याला सावध करतात.

या अभंगात श्री आनंदसागर हे त्यांच्या गुरुंनी, म्हणजे श्री गोंदवलेकर महाराजांनी, दाखवलेल्या मार्गानं जायची मनाला प्रार्थना करतात. अभंगात श्री आनंदसागर मनाला म्हणतात, तू असं काम निवड आणि कर की, जे भगवंताला आवडेल, ज्यात भगवंत साह्यकारी होईल, जे काम करण्यानं आपली वृत्ती रामाच्या किंवा भगवंताच्या पायी टिकायला मदत होईल, ज्या कर्मांनी आपल्याला याच लोकी मोक्षाचा आणि आनंदाचा अनुभव घेता येईल. आपणही अशी प्रार्थना आपल्या मनाला केली, तशी कर्मं करण्याचा प्रयत्न केला तर, ते श्री आनंदसागर, श्री महाराज यांच्यासारख्या सत्पुरुषांना तर आवडेलच, पण आपलंही त्यातून कल्याणच साधेल.

..५६..

ऐसे काही करी काम ।
जेणे साह्य होय राम ।।१।।
ऐसा करी काही धंदा ।
जेणे आवडे परमानंदा ।।२।।
ऐसा करी काही कृती ।
रामापायी राहे वृत्ती ।।३।।
ऐसा धरी काही मार्ग ।
जेणे हाता चढे स्वर्ग ।।४।।
हरी म्हणे मानी मना ।
गुरुचरणाच्या खुणा ।।५।।

– श्री आनंदसागर महाराज

(ट्रॅक नं. ०५७)

एखादी गोष्ट मिळवायची म्हटल्यावर त्यासाठी प्रयत्न करायला माणूस तयार होतो. मग त्याला हवा असतो तो, त्या प्रयत्नांचा मार्ग आणि त्या मार्गानं प्रयत्न केल्यावर ध्येयप्राप्ती होईल, याची खात्री. हे परमार्थातही लागू आहे.

असा मार्ग आणि खात्री या पदामध्ये भुकूमचे थोर प्रेमनिधी संत गणोरे बाबा देत आहेत. ते म्हणतात, आपला देह मुळात देवाच्या प्राप्तीसाठी दिला आहे, याची प्रथम ओळख करून घ्यावी. मग त्या प्राप्तीसाठी वाणीनं सत्याची कास धरावी, प्राणिमात्राविषयी दयाबुद्धी बाळगावी, दुसऱ्यांच्या उणिवा–दोष–दुर्वर्तन अशा गोष्टींबद्दल क्षमेची बुद्धी बाळगावी, रोज शांतीची साधना करावी, म्हणजे माणसाच्या ठिकाणीच देव प्रकट होतो. त्यामुळं आपल्या ठिकाणीच भगवंत आहे याची थेट, साक्षात अंतिम जाणीव, माणसाचं देवत्वात परिवर्तन घडवून आणते. पूज्य गणोरे बाबा सर्व संतांची ग्वाही देऊन याची सत्यता सांगतात. तसंच स्वत:च्या श्रद्धेनं आणि अनुभवानं त्याची खात्रीही देतात. साधकाला देवत्वाची वाटचाल करताना या पदाचा मोठाच दिलासा वाटेल.

..५७..

ऐसी संतांची ही ग्वाही । देव भेटे याचि देही ।।धृ।।

देह याचसाठी जाण । होई नर नारायण ।
तुझे तूच शोधुनि पाही । देव भेटे याचि देही ।।१।।

नित्य वदता सत्य वाणी । दया, क्षमा, शांती मनी ।
ऐसी स्थिती ज्याचे ठायी । देव भेटे याचि देही ।।२।।

जिव शिव जाणे मना । तोचि अद्वैत जाणा ।
श्रीरामाचा भाव राही । देव भेटे याचि देही ।।३।।

– श्री गणोरे बाबा

(ट्रॅक नं. ०५८)

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

भजन बिना सुख नाहीं...